बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१५ गोंदिया | अंक १२ | बुधवार, दि.२५ फेब्रु.ते ३ मार्च २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# तेलंगणात देवजीसह १५ नक्षल्यांचे आत्मसमर्पण

## देवजी गडचिरोलीतील अनेक नक्षली कारवायांचा सूत्रधार



### नक्षलवादी संघटनेचा कणा मोडेल

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद पूर्णपणे नष्ट करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. या संदर्भात सुरक्षा दलांनी छत्तीसगडच्या करेगुट्टा क्षेत्रात पुन्हा एकदा मोठी कारवाई सुरू केली आहे. संघटनेचा सर्वोच्च नेता देवजी आणि ज्येष्ठ नेता मल्लार-ाजी रेड्डी यांनी आत्मसमर्पण केल्याने नक्षलवादाच्या विरोधात सुरू असलेल्या अभियानासाठी हे एक महत्त्वाचे यश मानले जात आहे. सुरक्षा यंत्रणांचा असा विश्वास आहे की, यामुळे नक्षलवादी संघटनेचा कणा मोडेल आणि नक्षल प्रभावित भागात शांतता आणि विकास कार्याला चालना मिळेल.**

**गडचिरोली:-** देशातील नक्षलवादी चळवळीचा कणा मानल्या जाणाऱ्या सीपीआय (माओवादी) या प्रतिबंधित संघटनेला आतापर्यंतचा सर्वात मोठा धक्का बसला आहे. संघटनेचा सर्वोच्च नेता थिप्पीरी तिरुपती ऊर्फ "देवजी' (६२) याने आज आपल्या तीन अत्यंत विश्वासू आणि वरिष्ठ सहकाऱ्यांसह तेलंगणातील हैदराबाद येथे पोलीस मुख्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर आत्मसमर्पण केले. विशेष म्हणजे, आपण शस्त्रे सोडली असली तरी राजकीय विचार सोडलेला नाही आणि यापुढे कायद्याच्या चौकटीत राहून जनतेसाठी लढू, असे स्पष्ट करत देवजीने सक्रिय राजकारणात येण्याचे संकेतही दिले आहेत.

गेल्या चार दशकांपासून भूमिगत असलेल्या नक्षल चळवळीतील "थिंक टँक' मानल्या जाणाऱ्या चार बड्या नेत्यांनी तेलंगणा पोलीस महासंचालक बी. शिवधर रेड्डी, सहाय्यक पोलीस महासंचालक महेश भागवतसह यांच्या समक्ष शरणागती पत्करली. आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये देवजीसह केंद्रीय समिती सदस्य मल्ला राजी रेड्डी ऊर्फ संग्राम (७६), तेलंगणा राज्य सचिव बडे चोक्का राव ऊर्फ दामोदर (४७) आणि राज्य समिती सदस्य नुने नरसिंम्हा रेड्डी ऊर्फ "गंगन्ना' (६२) यांचा समावेश आहे.

यावेळी माहिती देताना तेलंगणाचे पोलीस महासंचालक बी. शिवधर रेड्डी यांनी सांगितले की, गेल्या तीन वर्षांत तेलंगणा राज्यात एकूण ५९१ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. आजच्या या मोठ्या शरणागतीनंतर आता राज्यात केवळ ११ सक्रिय सदस्य उरले असून, नक्षल चळवळ पूर्णपणे खिळिखळी झाली आहे. मूळचा तेलंगणातील करीमनगर जिल्ह्याचा रहिवासी असलेल्या देवजीवर विविध राज्यांत एकूण १० कोटी रुपयांचे बक्षीस होते. मे २०२५ मध्ये तत्कालीन सर्वोच्च नेता नंबाला केशव राव ऊर्फ बसवराजू हा सुरक्षा दलांच्या चकमकीत ठार झाल्यानंतर, अवघ्या आठ महिन्यांपूर्वीच देवजीकडे संघटनेची सूत्रे आली होती.

१९८० च्या दशकात गडचिरोलीत नक्षलवादाची मुळे घट्ट करण्यात त्याचा मोठा वाटा होता. १९९१ मधील आमदार धर्मरावबाबा आत्राम यांचे अपहरण असो किंवा २००८ मधील दंतेवाडा येथील जवानांवरील भीषण हल्ले, या सर्व कारवायांचा मास्टरमाईंड देवजीच होता.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मार्च २०२६ पर्यंत नक्षलवाद समूळ नष्ट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

याच मोहिमेअंतर्गत सीमावर्ती भागातील करेगुट्टा टेकडी परिसरात नक्षलविरोधी कारवाया तीव्र करण्यात आल्या आहेत. या वाढत्या दबावामुळेच देवजी व त्याच्या सहकाऱ्यांनी शरणागतीचा मार्ग पत्करल्याचे बोलले जात आहे. आता या संघटनेत केवळ मुप्पाला लक्ष्मण राव ऊर्फ "गणपती' आणि मिशीर बेसरा हेनेते उरले असून, गणपती देखील आजारपणामुळे अनेक दिवसांपासून अज्ञातवासात आहे. या शरणागतीमुळे देशातील नक्षलवादी चळवळ आता पूर्णपणे नेतृत्वहीन झाली आहे.

### नक्षल चळवळीतील प्रवास

**थिप्पारी तिरुपती (६४) हा तेलंगणातील जगतियाल जिल्ह्यातील कोरुटला गावातील डॉ. आंबेडकर नगर येथील रहिवासी होता. १९८० मध्ये इंटरमिडिएट पदवीचे शिक्षण घेत असताना तो करीमनगर क्रांतिकारी विद्यार्थी चळवळीत सामील झाला. १९८३ मध्ये पिपल्स वॉर ग्रुपमध्ये सामील झाला. सुरुवातीला त्याने गडचिरोली जिल्ह्यात दलम सदस्य आणि कमांडर म्हणून काम केले. नंतर तो विभागीय समिती सदस्य झाल्यानंतर त्याच्यावर दंडकारण्य प्रदेशाची जबाबदारी सोपवण्यात आली. २००१ मध्ये त्याला केंद्रीय समिती सदस्य आणि केंद्रीय लष्करी कमिशनचा प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आले. एप्रिल २०१० मध्ये दंतेवाडा जिल्ह्यात भूसुरुंग स्फोटात ७६ जवान शहीद झाले होते. या दोन्ही घटनांमध्ये देवजीची हात असल्याचे सांगितले जाते.**

गडचिरोलीसह छत्तीसगड राज्यातील अनेक नक्षली कारवायांचा सूत्रधार असेलेल्या माओवादी कम्युनिस्ट संघटनेचा प्रमुख नेता थिप्परी तिरुपती उर्फ देवजी आणि केंद्रीय समिती सदस्य मल्लाराजी रेड्डी उर्फ संग्राम यांच्यासह १५ हून अधिक सशस्त्र नक्षल्यांनी तेलंगणा राज्यातील आसिफाबाद पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. त्याचे आत्मसमर्पण हे नक्षलवाद निर्मूलन मोहिमेतील एक मोठे यश मानले जात आहे.

एप्रिल-मे २०२५ मध्ये छत्तीसगडच्या करेगुट्टा पहाडी भागात संयुक्त कारवाई करून १० हजारांहून अधिक पोलिस जवानांनी नक्षलवाद्यांना चारही बाजूनी घेरले होते. या कारवाईदरम्यान, २१ मे २०२५ रोजी माओवादी चळवळीचा तत्कालीन सर्वोच्च नेता नंबला केशव राव उर्फ बसवराजू हा ठार झाला. त्यानंतर थिप्परी तिरुपती उर्फ देवजी याला संघटनेचा राष्ट्रीय सरचिटणीस बनविण्यात आले. बसवराजूच्या मृत्यूनंतर संघटनेचा सेकंड-इन-कमांड मल्लोजुल्ला वेणुगोपाल उर्फ भूपती उर्फ सोनू याने १५ ऑक्टोबर २०२५ रोजी गडचिरोली येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केले. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी कमांडर माडवी हिडमा आणि त्याची पत्नी छत्तीसगड पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत मारले गेले.

तेव्हापासून देवजीच्या आत्मसमर्पणाबद्दल अटकळ बांधली जात होती आणि आता ती खरी ठरली आहे.

# बाळ खरेदी करणारी महिला अटकेत; डॉक्टरच्या वैद्यकीय पदवीचा तपास सुरु

**भंडारा :-** बाळ विक्री प्रकरणातील महत्त्वाचा दुवा पोलिसांच्या हाती लागला आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून फरार असलेल्या मालती वाघमारे या महिलेला अटक करण्यात यश आले आहे. उघड झालेल्या या प्रकरणातील पहिल्या बाळाची तिने खरेदी केली होती.

दरम्यान, तीन दिवसांपूर्वी अटक करण्यात आलेला मुख्य सूत्रधार डॉ. नितेश वाजपेयी याच्या तीन दिवसांच्या पोलिस कोठडीची मुदत सोमवारी संपल्याने त्यालाही न्यायालयापुढे हजर करण्यात आले. या प्रकरणाच्या तपासात मुळापर्यंत जायचे असल्याने पोलिसांनी न्यायालयापुढे ११ दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी केली होती. मात्र, त्याला ७ दिवसांची पोलिस कोठडी वाढवून देण्यात आली आहे.



### दुसऱ्या बाळाच्या पालकाचा तपास सुरू

**जिल्हा पोलिस अधीक्षक नुरुल हसन यांची पत्रकार परिषदेत म्हणाले, डॉ. नितेश वाजपेयी याने सागर शिक्का या मध्यस्थाच्या माध्यमातून दुसऱ्या बाळाची विक्री केल्याचे पुरावे पोलिसांकडे आहेत. आता त्या बाळाच्या पालकांचा शोध सुरू आहे.डॉ. वाजपेयीने आपल्या गोंदियातील रुग्णालयातून रॅकेट चालविल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्याच्या हॉस्पिटलमध्ये लगतच्या मध्य प्रदेशातील लोकांचे येणे-जाणे असायचे. त्यावरून आंतरराज्यीय संबंधाची शक्यता नाकारता येत नाही. तपासात दत्तक संबंधी कागदपत्रे आढळली नाहीत. मात्र, व्हॉट्सअॅपवरील चॅटिंगवरून आर्थिक देवाणघेवाणीचे पुरावे आहेत.**



### रजिस्ट्रेशन रद्द करण्यासाठी पत्र

**डॉ. वाजपेयी याच्या रुग्णालयाचे रजिस्ट्रेशन रद्द करण्यासाठी पोलिसांनी गोंदियाच्या जिल्हा शल्य चिकित्सकांना पत्र दिले आहे. कागदपत्रांवरून या डॉक्टरच्या डिग्रीबद्दलही शंका घेतली जात आहे. या डॉक्टरने २०१७ ते २०२२ या काळात विदेशातून एमबीबीएस केले आहे. मात्र, फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन केव्हा दिली, याबद्दल स्पष्टता नाही.**

चाईल्ड हेल्प लाईनचे समन्वयक सौ. लोकप्रिया देशभ्रतार व त्यांचे कार्यालयीन पथक यांनी मालती वाघमारे हिची भेट घेतल्यानंतर हा प्रकार समोर आला होता. तक्रारीनंतर नवजाळ बाळ विक्री प्रकरणी पोलीस स्टेशन वरठी येथे गोंदिया येथील डॉ. नितेश नरेंद्रकुमार वाजपेयी (वय ४०), मालती प्रकाश वाघमारे रा. पांढराबोडी ता.भंडारा, ललेश्वर नंदकिशोर सादेपाच (३९) रा. रामनगर गोंदिया, पौर्णिमा सतिश धुर्वे (वय ३०) रा. रामनगर गोंदिया, उमेशसिंग रामचंद्रसिंग गडलोत (वय ४८) रा. गोंदिया व सागर सिक्का रा. गोंदिया यांचेवर कलम १४३ (४), १३७ (२), ३ (५) भा. न्या.सं. सहकलम ८०, ८१ अल्पवयीन न्याय (मुलाची काळजी व संरक्षण) कायदा २०२५ अन्वये दि. ६ फेब्रुवारी रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक नुरुल हसन, अप्पर पोलीस अधीक्षक निलेश मोरे यांचे मार्गदर्शनात साकोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी शिवम विसापुरे हे करीत आहेत.

### डॉक्टरने केलेल्या आरोपांची चौकशी करू

**डॉक्टर वाजपेयी याने, पोलिसांकडून आणि मीडियाकडून मोठ्या रकमेची मागणी झाल्याचे आरोप केले आहेत. माध्यमांचा हवाला देऊन आमदार नरेंद्र भोंडेकर यांनीही पोलिसांवर जाहीर आरोप केले आहेत. यासंदर्भात विचारणा केली असता, या आरोपांमध्ये तथ्य असेल, तर चौकशी केली जाईल. या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती नागरिकांकडे असल्यास त्यांनी पोलिसांना कळवावी, असे आवाहन नुरुल हसन यांनी केले.**

# लोककल्याणकारी योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा-अपर जिल्हाधिकारी मिनाज मुल्ला



गोंदिया : शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी मिनाज मुल्ला यांनी केले.जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित ङ्गयोजना जनकल्याणाच्या मल्टीमीडिया प्रदर्शनाचेङ्ग उद्घाटन श्री. मुल्ला यांच्या हस्ते आज करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी तहसिलदार समशेर पठाण, अपर तहसिलदार श्रीकांत कांबळे, जिल्हा उपनिबंधक अर्चना माळवे, जिल्हा माहिती अधिकारी अंजु कांबळे-निमसरकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

श्री. मुल्ला पुढे म्हणाले, शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना आहेत. परंतु, या योजनांची लोकांना माहिती नसल्यामुळे सदर योजनांपासून सर्वसामान्य नागरिक वंचित राहतात. त्यामुळे सदर योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल तेव्हाच योजनांची फलश्रुती होईल असे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हा माहिती कार्यालयाचा हा स्तुत्य उपक्रम आहे. शासनाच्या सर्वसाधारण योजनांच्या या एकाच ठिकाणी प्रधानमंत्री पीक विमा योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना, प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना, वैयक्तिक शेततळे योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना अशाप्रकारच्या एकूण ४० योजनांचा या प्रदर्शनीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी नवीन प्रशासकीय इमारतीत लावण्यात आलेल्या २४ ते २६ फेब्रुवारी २०२६ या तीन दिवसीय चित्रमय प्रदर्शनास भेट देऊन माहिती जाणून घ्यावी व शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन आपले जीवनमान उंचवावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी मिनाज मुल्ला यांनी यावेळी केले.

राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध विभागातील लोककल्याणकारी योजनांची माहिती गोंदिया जिल्ह्यातील नागरिकांना मल्टीमीडियाच्या माध्यमातून व्हावी, या उद्देशाने जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने २४ ते २६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत छायाचित्र प्रदर्शनीचे आयोजन नवीन प्रशासकीय इमारत, तळमजला, जयस्तंभ चौक, गोंदिया येथे करण्यात आले आहे. प्रत्येक विभागाने योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून काम करावे. सदर प्रदर्शनी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुली आहे, असे जिल्हा माहिती अधिकारी अंजु कांबळे-निमसरकर यांनी प्रास्ताविकातून सांगितले.

यावेळी तहसिलदार समशेर पठाण, अपर तहसिलदार श्रीकांत कांबळे, जिल्हा उपनिबंधक अर्चना माळवे यांनी शासनाच्या सर्वसाधारण योजनांच्या ४० योजनांची माहिती एकाच ठिकाणी चित्रमय स्वरुपात उपलब्ध होत असल्यामुळे या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करुन जिल्ह्यातील शेतकरी, नवउद्योजक, महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांनी या प्रदर्शनीला अवश्य भेट द्यावी असे आवाहन केले.याप्रसंगी असर फाऊंडेशनचे विक्रम फडके व त्यांच्या चमुने शासनाच्या सर्वसाधारण योजनांची माहिती कलापथनाट्यद्वारे सादर करुन उपस्थितांचे मने जिंकली.

या प्रदर्शनीच्या ठिकाणी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या पापड, कुरोडी व चिप्सचे स्टॉल आणि जिल्हा परिषदेच्या उमेद अंतर्गत गोंडी पेंटींगचे स्टॉल लावण्यात आले आहेत.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रजनी रामटेके यांनी केले, तर उपस्थितांचे आभार उपसंपादक कैलाश गजभिये यांनी मानले. कार्यक्रमास नवीन प्रशासकीय इमारतीतील विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गोंदिया-जबलपूर दुहेरी रेल्वे मार्ग प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने रेल्वे मंत्रालयाच्या गोंदिया-जबलपूर दुहेरी रेल्वे लाईन प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाचा अंदाजे खर्च ५,२३६ कोटी असून तो ५ वर्षांच्या कालावधीत पूर्ण केला जाईल.

# जातनिहाय जनगणनेसाठी ओबीसी संघटनांनी फुंकले आंदोलनाचे रणशिंग

**भंडारा :-** केंद्र सरकारकडून २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात (घरांची सूची) ओबीसी समाजासाठी स्वतंत्र रकाना नाही. त्या निषेधार्थ आणि जातीनिहाय जनगणनेसाठी सकल ओबीसी समाज संघटना पेटून उठल्या आहेत. 'ओबीसींची स्वतंत्र जनगणना करा, आमचा हक्क प्रदान करा', असा आक्रमक पवित्रा घेत १ मार्च रोजी नागपूर येथे धरणे आंदोलन, तर २२ मार्च रोजी भंडारा शहरात 'ओबीसींचा महामोर्चा' काढण्याची घोषणा सकल ओबीसी समाज समन्वय समितीने २२ फेब्रुवारीला पत्रकार परिषदेतून केली.

पत्रकार परिषदेला आमदार नाना पटोले, खासदार डॉ. प्रशांत पडोळे, मुख्य समन्वयक सदानंद इलमे, प्रभाकर वैरागडे, उमेश कोर्राम, संजय मते, डॉ. बाळकृष्ण सार्वे, प्रभाकर वैरागडे, रमेश शहारे, रोशन उरकुडे, जयंत झोडे, विष्णू जगनाडे, भगीरथ धोटे, वामनराव वझाडे, राजेश इसापुरे, पुरुषोत्तम देशमुख, मोरेश्वर तिजारे आदींनी आंदोलनाची दिशा स्पष्ट केली.या आंदोलनाला आ. डॉ. परिणय फुके, आ. राजू कारेमोरे व अन्य ओबीसी पुढाऱ्यांचा पाठिंबा असल्याचेही सांगण्यात आले.



### आंदोलनाची मुख्य कारणे आणि आक्षेप

**२०२७ च्या जनगणनेसाठी तयार करण्यात आलेल्या प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १२ मध्ये अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) यांच्यासाठी स्वतंत्र रकाने आहेत. मात्र, देशातील ६० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या असलेल्या ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलम ठेवण्यात आलेला नाही. हा ओबीसींच्या अस्तित्वावर घाला असून, समाजाची अचूक संख्या दडपण्याचा हा डाव असल्याचा आरोप समितीने केला आहे.**

### २२ मार्चला भंडाऱ्यात महामोर्चा ;प्रमुख मागण्या

**जनगणना २०२७ च्या प्रश्नावलीत ओबीसींसाठी त्वरित स्वतंत्र रकाना समाविष्ट करावा. संपूर्ण देशात तातडीने जातीनिहाय जनगणना राबवून लोकसंख्येनुसार वाटा द्यावा. ओबीसी समाजाच्या घटनात्मक आरक्षणाला कोणताही धक्का लावू नये.**

### तर सरकारविरुद्ध रस्त्यावर उतरण्याचा इशारा

**सरकार आमची गणना करण्यास का घाबरत आहे? जोपर्यंत आमची मोजणी होत नाही, तोपर्यंत आम्हाला आमचा न्याय्य हक्क मिळणार नाही. जनगणनेत ओबीसींचा कॉलम नसणे, हे आमचे अस्तित्व नाकारण्यासारखे आहे. या अन्यायाविरुद्ध आता भंडारा जिल्ह्यासह विदर्भातील सर्व जिल्ह्यांतील कार्यकर्ते रस्त्यावर उतरतील, असा इशारा सकल ओबीसी समाज समन्वय समितीने दिला आहे.**

# "अजित पवारांच्या रुपात महाराष्ट्राला एक चांगला मुख्यमंत्री मिळाला असता"

**मुंबई:** - महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल विधानसभेत शोकप्रस्ताव मांडत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. कर्तृत्ववान, शिस्तप्रिय आणि निश्चयी नेतृत्व असलेल्या अजितदादांच्या रूपाने आपण वैयक्तिक मित्र गमावला असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "अजित पवार वॉज द बेस्ट चीफ मिनिस्टर महाराष्ट्र नेव्हर हॅड', अजितदादाच्या रुपात एक चांगला मुख्यमंत्री महाराष्ट्राला मिळू शकला असता, तो आता आपल्यामध्ये नाही. त्यांच्यात मुख्यमंत्रीपदासाठी आवश्यक संपूर्ण क्षमता, दृढ निश्चय आणि प्रामाणिकता होती, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

दिवंगत अजित पवारांसारखा नेता जेव्हा आपल्यातून निघून जातो, तेव्हा खऱ्या अर्थानं पोकळी म्हणजे काय हे लक्षात येतं. ती पोकळी केवळ राजकीय नाही, तर भावनिकही आहे. काही जखमा काळ बऱ्या करतो, पण काही वेदना कायम राहतात, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शोकप्रस्तावावर म्हणाले की, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार हे कार्यमग्नतेचे प्रतीक होते. वक्तशीरपणा, शिस्त आणि निर्णयक्षमतेची सांगड त्यांनी आपल्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत घातली. मंत्रालयात वेळेआधी उपस्थित राहून दिवसभर कामकाजाचा आढावा घेणे आणि कोणतीही फाईल प्रलंबित न ठेवणे ही त्यांची कार्यपद्धती होती. त्यांच्या उपस्थितीमुळे प्रशासनात एक वेगळी ऊर्जा निर्माण होत असे.



प्रत्येक विषयाचा बारकाईने अभ्यास, स्पष्ट भूमिका आणि निर्णय घेण्यातील धाडस यामुळे ते प्रभावी प्रशासक म्हणून ओळखले जात. लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांमध्ये त्यांच्याविषयी विश्वासाची भावना होती. राज्यहिताचा प्रश्न आला की, राजकीय भेदाभेद बाजूला ठेवून सकारात्मक भूमिका घेणे ही त्यांची कार्यसंस्कृती होती, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

राज्याच्या विकासात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या योगदानाचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पायाभूत सुविधा, वित्त, शेती आणि सिंचन या क्षेत्रांत त्यांनी ठोस आणि दूरगामी निर्णय घेतले. लोककल्याणाच्या योजनांबाबत त्यांनी ठाम भूमिका घेत राज्याच्या सर्वसामान्य नागरिकांपर्यंत लाभ पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जाण्याने राज्याच्या सार्वजनिक जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या कार्याचा ठसा आणि त्यांनी निर्माण केलेली कार्यसंस्कृती पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील, अशा शब्दात त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी माजी मंत्री सुरुपसिंग नाईक, डॉ. शालिनीताई वसंतराव पाटील, राज खंगारजी पुरोहित तसेच माजी सदस्य गंगाधर महालप्पा पटने, नीळकंठ चिंतामण फालक, विश्वास रामचंद्र नांदेकर आणि रुपलेखा खंडेराव ढोरे यांच्या निधनाबद्दलही शोक व्यक्त केला.

# क्षयरोग दुरीकरण मोहिमेत गोंदियाला राज्यस्तरावर द्वितीय पुरस्कार

**गोंदिया:-** राष्ट्रिय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील ग्रामीण व शहरी भागात गोंदिया जिल्ह्याने वर्ष २०२५-२६ मध्ये पुन्हा एकदा भरारी घेत क्षयरोग नियत्रंण कार्यक्रम प्रभाविपणे राबवत राज्यात नावलौकीक प्राप्त करुन व्दितीय स्थान पटकाविले आहे. राज्यातील सर्व जिल्ह्याचे केंद्र सरकारने दिलेल्या निर्देशकानुसार क्षयरोग कार्यक्रम मध्ये केलेल्या कामानुसार रैंकिंग केले जाते.

राज्य शासनाच्या व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने दि.२२ फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान २०२६ पुरस्कार वितरण सोहळा प्रसंगी गोंदिया क्षयरोग विभागाला महाआरोग्य सन्मान २०२६ पुरस्काराने सन्मानित आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर व राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा क्षयरोग अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांना गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देवुन सन्मानित करण्यात आले.




जिल्ह्यात जिल्हा क्षयरोग अधिकारी यांच्या नेतृत्वात तब्बल १४ विविध ईडीकेटरनुसार क्षयरोग कार्यक्रम राबवुन लोकांना अविरत आरोग्य सेवा देण्यात येत आहे.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजित गोल्हार यांच्या नेतृत्वात जिल्हा क्षयरोग विभागाने उत्कृष्ट सांघिक कार्य व गाव पातळीवर केलेले सूक्ष्म नियोजनाच्या जोरावर राज्यात द्वितीय स्थान पटकविण्याचा बहुमान जिल्ह्याने प्राप्त केले.

उपलब्ध साधन सामुग्री व मनुष्यबळात त्यांनी दिलेल्या उत्कृष्ट आरोग्य सेवेबद्दल जिल्हाधिकारी प्रजित नायर,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम ,जि.प.अध्यक्ष लायकरामजी भेंडारकर,उपाध्यक्ष सुरेशजी हर्षे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार व त्यांचे टिमचे अभिनंदन केले आहे.

संपादकीय

# मुलांना तणावमुक्त ठेवा

मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या अशा बारावी-दहावी परीक्षा राज्यात सुरू झाल्या आहेत. या परीक्षेच्या कार्यकाळात मुलं अभ्यासाच्या तणावातून जात असतात. तेव्हा पालकांनी मुलांच्या आरोग्याकडे बारकाईने लक्ष द्यायला हवे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून राज्यात सुरू झाली आहे. या परीक्षा पुणे, मुंबई, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, लातूर, कोल्हापूर व कोकण अशा ९ विभागीय मंडळांच्या मदतीने घेत असतात. दोन्ही परीक्षा मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या आहेत. पालकांनी मुलांच्या तणावाच्या लक्षणांकडे बारकाईने लक्ष द्यायला हवे. म्हणजे त्यांना परीक्षाकाळात तणावमुक्त परीक्षा देता येईल. त्यासाठी पालकांनी परीक्षेच्या कार्यकाळात परीक्षा सुरू असताना मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.

परीक्षेचे वेळापत्रक जसजसे जवळ येते तसतसे मुलांचा ताण वाढायला मदत होत असते. जी मुले नियमित अभ्यास करतात त्यांना कोणत्याही प्रकारचा ताण जाणवत नाही. तेव्हा आई-वडिलांनी मुलांची केवळ परीक्षेपुरती काळजी न घेता नियमितपणे काळजी घेतली पाहिजे. बऱ्याच वेळा परीक्षा जवळ आली की मुलांची डोकेदुखी, पोटदुखी, अंगदुखी, झोप न येणे, मूल चिडचिडे होणे असे दिसून येते.

अशा वेळी पालकांनी मुलांना विश्वासात घेऊन सकारात्मक दृष्टिकोन मुलांबरोबर ठेवावा. याचा परिणाम म्हणून त्यांना प्रोत्साहन मिळून ती अधिक जोमाने अभ्यास करून तणावमुक्त होऊन परीक्षेला आनंदाने सामोरे जातील. पालकांनी आपली मुले परीक्षेत यशवंत होण्यासाठी परीक्षेच्या कालावधीत मुलांच्या मनात तणाव वाढणार नाही याची काळजी घ्यावी. तेव्हा मुलांच्या अभ्यासातील प्रगतीचा भूतकाळ बघत होता किंवा त्यांना काय केले याची उजळणी न करता त्यांच्या भविष्याचा विचार करून त्यांच्याशी सुसंवाद साधावा. मुलांच्या परीक्षेविषयी त्यांच्या मनातील भीती दूर करावी. त्यांना आनंदित ठेवावे. पालकांनी अभ्यासासाठी जास्त सक्ती करू नये. मुलांनासुद्धा आपल्या परीने अभ्यास करू द्यावा. तेव्हा आपल्यावरती आता धाक नाही असे मुलांनी न समजता अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये. यात आपलेच नुकसान होणार आहे, याची मुलांनी दक्षता घ्यावी. यासाठी मुलांनी आज्ञाधारक राहिले पाहिजे.

महत्त्वाची बाब म्हणजे, आपले मूल परीक्षेच्या काळात पुरेसे जेवण करीत आहे का? याकडे सुद्धा पालकांनी लक्ष द्यायला हवे. मुलांची बौद्धिक क्षमता वाढण्यासाठी त्यांचे आरोग्य चांगले असावे लागते. त्यासाठी त्यांना संतुलित आहार नियमित मिळणे आवश्यक आहे. म्हणजे त्यांची ऊर्जा टिकून राहते. परीक्षा काळात मुलांच्या जेवणात बदल करू नये. तसेच त्यांना पुरेशी झोप घेण्यास सहकार्य करावे.


मुलांना पुरेशी झोप मिळाल्यामुळे ते अधिक एकाग्रतेने अभ्यास करू शकतात. त्यात टीव्ही पाहणे आणि आरोग्यासाठी व्यायाम अतिशय महत्त्वाचा असतो. काही पालक रात्रभर अभ्यास करा असे मुलांना सांगत असतात किंवा अभ्यासिकेत पाठविले जाते. अशा वेळी पालकांनी सुद्धा मुलांचा कल लक्षात घेणे गरजेचे असते. कारण इतरांपेक्षा आपल्या मुलांच्या आवडीनिवडी पालकांना जास्त माहिती असतात. अभ्यासाबरोबर आरामाचीसुद्धा मुलांना नितांत आवश्यकता असते. याकडे सुद्धा पालकांनी अधिक लक्ष द्यायला हवे. याचा जास्त फायदा आपल्या मुलांना होत असतो. याची कल्पना पालकांना असायला हवी.

अभ्यासाबरोबर घराचीसुद्धा स्वच्छता जास्त महत्त्वाची असते. त्याचबरोबर पालकांनी स्वतः शांत राहणे महत्त्वाचे असते. परीक्षा काळ दररोज होत नाहीत. मात्र परीक्षेचा काळ मुलांप्रमाणे पालकांसाठीही महत्त्वाचा असतो. या कार्यकाळात मुलांना तणावमुक्त होण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे असते, मात्र यात जास्त वेळ घालवू नये. मुलांच्या अभ्यासासाठी कशी मदत होईल त्या दृष्टीने प्रयत्न करावा. यात जास्त वेळ घालवू नये. परीक्षेच्या काळात मुलांना ताण वाढवणाऱ्या मुलांनी त्यांचा सामना कसा करावा याचा योग्य सल्ला द्यावा. या काळात मुलांना अभ्यास करताना व्यत्यय येणार नाही याची पालकांनी काळजी घ्यावी. आरामात अभ्यास करेल अशा जागेत त्याला अभ्यास करण्यासाठी बसवावे. परीक्षा सुरू असल्याने आपल्या मुलांना प्रेरित करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

विद्यार्थी आणि परीक्षा यांचा कसा संबंध असतो. परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यावर आपले ध्येय सहज पार करू शकतो याची आठवण मुलांना करून द्यावी. काही वेळा परीक्षा काळात मुलांना चिंताग्रस्त होणे साहजिकच आहे. मात्र सकारात्मक दृष्टिकोन मुलांनी ठेवायला पाहिजे. ही नैसर्गिक प्रतिक्रिया असून त्यावर सहज मात करता आली पाहिजे. यासाठी वर्षभरात झालेला अभ्यास दररोज करणे आवश्यक आहे. अभ्यास झाला असेल तर त्याकडे दुर्लक्ष न करता अधूनमधून अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून अभ्यास करावा. म्हणजे त्या अभ्यासाची उजळणी होऊन मुलांच्या मनात तणाव निर्माण होत नाही. यात अभ्यासात चुकारपणा मुलांनी करू नये.

अभ्यासासाठी मुलांवर दबाव वाढवू नये तर मुलांच्या समस्या सुद्धा पालकांनी समजून घेणे गरजेचे असते. परीक्षा झाल्यावर पेपरमध्ये कठीण प्रश्न कोणते होते? किती लिहिलाय? पेपर पूर्ण लिहिला काय? असे अनेक प्रश्न विचारत बसण्यापेक्षा आता पुढील परीक्षा कोणत्या विषयाची आहे. त्या विषयावर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. परीक्षेला घरातून जाताना मुलांना आधार दिला पाहिजे. तसेच त्यांना धीर द्यावा म्हणजे मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त परीक्षा देऊ शकतात. तेव्हा मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त होण्यासाठी पालकांनी प्रोत्साहन द्यावे.

# कर्मयोगी संत गाडगेबाबा आणि समाजप्रबोधन



महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सुधारणावादी परंपरेत १९०५ ते १९५६ असे सतत पाच दशके ज्यांनी समाज सुधारणा घडवून आणल्या, त्या कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची आज जयंती.भुकेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या-नागड्यांना वस्त्र,गरीब मुला - मुलींना शिक्षण, बेघरांना आसरा, दिव्यांगांना औषधोपचार, बेकारांना रोजगार, पशुपक्षी -मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण-तरुणींचे लग्न, दुःखी व हतबल असणाऱ्यांना हिम्मत देण्याची आचरण सूत्री सांगून त्यालाच रोकडा धर्म म्हणणारे गाडगेबाबा आज स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी पर्वातही समाजाचा आरसा बनून मार्गदर्शन करत आहे.

गाडगेबाबा म्हणजे भारतीय समाजसुधारणेतील आधुनिक काळातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व.वैराग्याचा मूर्तिमंत अविष्कार म्हणजे गाडगेबाबा. लोकशिक्षणाचे चालते बोलते विद्यापीठ म्हणजे गाडगेबाबा.अंधश्रद्धेवर थेट प्रहार म्हणजे गाडगेबाबा.दिव्यांगांचा,निराश्रीतांचा बाप म्हणजे गाडगेबाबा. जातीभेदांवर प्रहार म्हणजे गाडगेबाबा. हिंसात्मक कुळधर्मांना, नवसाला हद्दपार करणारा कर्मयोगी म्हणजे गाडगेबाबा. मुक्या प्राण्यांच्या बळी प्रथेविरुद्धचा प्रबोधनकार म्हणजे गाडगे बाबा. थोडक्यात त्यांच्या जीवनाचे ध्येय सर्वसामान्यांचे कल्याण, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता आणि देवधर्माच्या अंध फंद्यात अडकून पडलेल्या समाजाला मानवतेचा श्रेष्ठ आदर्श घालणे होते.

संत गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शेंडगाव येथे झाला. लहानपणी त्यांना डेबू म्हणत.

त्यांच्या वडिलांचे नाव झिंगराजी आणि आईचे नाव सखूबाई होते. आडनाव जानोरकर. लहानपणीच व्यसनाधीनतेने वडीलांचे निधन झाल्यामुळे ते आपल्या आईसोबतअकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे या गावी मामाकडे राहायला गेले. त्यांच्या जीवनातील प्रारंभिक काळातील संघर्षांनी, कुप्रथांनी व त्यातून आलेल्या दुःखांनी त्यांच्या मनात समाजसेवेचा आणि दीन-दुखितांच्या मदतीचे बीज रुजवले.शेती,माती,संसारामध्ये रमलेल्या डेबुजींना तत्कालीन समाजातील अंधश्रद्धा व कुप्रथांनी समाजासाठी लढण्यास प्रवृत्त केले. १९०५ नंतर त्यांनी कुटुंब आणि संसार त्यागून गावोगावी फिरून लोकांना समाजातील दोष समजावून सांगण्याचा निर्णय घेतला. केवळ महाराष्ट्रच नाहीत तर गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश व अन्य राज्यातही त्यांनी प्रबोधनाचे कार्य केले.

त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा भाग म्हणजे कीर्तनात्मक भजनातून अंधश्रध्दा निर्मूलन केले. आपल्या व-हाडी भाषेमध्ये सहज विनोदाची,संवादाची पेरणी करत आणि जगण्यातील विसंगती मांडत त्यांनी कर्मकांडावर हल्ला केला.त्यांचे कीर्तन म्हणजे विवेचनकार आणि श्रोते यांच्यातील प्रश्नोत्तराचा सुलभ सादरीकरणाचा प्रबोधनात्मक अविष्कार होता.

या अशिक्षित माणसाच्या कीर्तनाचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून आचार्य प्र.के. अत्रे, पंजाबराव देशमुख यांच्यासारख्या विद्वानांनी खाली बसून रसग्रहण केले. साध्या सोप्या शब्दांमध्ये ते विवेचन करायचे. त्यांच्या विवेचनाला गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला या भजनाचे पार्श्वगायन असायचे. विशेष म्हणजे संपूर्ण श्रोते भजन गायनात सहभागी व्हायचे.समाजाच्या अंधश्रद्धा, चाली, रुढी ,परंपरा यावर तुटून पडण्याच्या त्यांच्या आक्रमक शैलीचे वर्णन करताना आचार्य अत्रे यांनी म्हटले होते... "सिंहाला पहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, गाडगेबाबांना पहावे कीर्तनात.."

भारतीय संत परंपरेतील क्रांतिकारक विचार मांडणाऱ्या संत तुकाराम, संत कबीर यांच्या अभंग आणि दोह्यांचा अचूक वापर ते त्यांच्या कीर्तनात करायचे...

मुला-मुलींच्या जन्मासाठी मुक्या असाह्य प्राण्यांची हत्या करून नवस फेडणे आणि त्यासाठी कर्ज काढणे अशा रूढींवर ते आक्रमणपणे प्रहार करायचे. तुकोबारायांच्या अभंगांचा वापर करताना ते म्हणायचे...

नवसे कन्या पुत्र होती
मग का करणे लागे पती

किंवा पिंडदानासारख्या अनिष्ट प्रथांवर प्रहार करताना कीर्तनात कबीराचे दोहे वापरायचे...

जीते बाप को रोटी ना दे
वह मरे बाद पछताए
मुठ भर चावल लेकर
कौवा को बाप बनाएं

उठ सूट शेंदूर पासून देव बनवणे. पुढे त्याचे मंदिर घडविणे आणि कर्मकांडात समाजाला बुडविणे याला विरोध करताना ते म्हणायचे...

जत्रा मे पत्रा बिथाया तीर्थे बनाया पानी
भई दुनिया बड़ी दिवानी ये तो पैसे की धुलधानी

त्यांचे समाजप्रबोधनाचे विचार त्या काळातील भारतीय ग्रामीण जीवनाची परिस्थिती बदलण्याचा क्रांतीकारी प्रयत्न होते. त्या काळात भारतीय ग्रामीण भागामध्ये अंधश्रद्धा, कर्मकांड, नशा, धर्मभेद, प्राण्यांचे बळी, जातीभेद, अस्पृश्यता, हुंडा पद्धती आणि निरक्षरता या सर्व सामाजिक बंधनांनी लोकांचे मन जड झालेले होते. गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनात अंधश्रद्धा, देव-धर्मा विषयी चुकीचे विश्वास आणि सार्वजनिक अस्वच्छते विरुद्ध आघात केला.

गाडगेबाबांचे कार्य सर्वसामान्यांसाठी समर्पित होते. त्यांनी सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य विषयक संदेश देण्यासाठी ते ज्या गावात प्रवेश करत, तेथे प्रथम स्वयं आणि उपस्थित लोकांना मिळून रस्ते, सार्वजनिक जागा, मंदिर परिसर, तलाव अशा सर्व ठिकाणी स्वच्छता अभियान राबवायचे.याच ठिकाणी त्यांनी धर्मशाळा, आश्रम शाळा, नद्यांचे घाट, पाणपोया, गोरक्षण उघडले. स्वतः खराटा घेऊन त्यांची स्वच्छता सुरू व्हायची.त्यांचा संदेश फक्त उपदेश स्वरूपात नव्हे तर प्रत्यक्ष कार्य करून दाखवून देण्याची प्रेरणा म्हणून होता.

कीर्तनाचा प्रारंभ हा स्वच्छता अभियानातून करणारा हा महापुरुष तत्कालीन समाज व्यवस्थेत धार्मिक पाखंडावर आसूड उमटवायचा.मंदिरात देव शोधणे ऐवजी माणसातच देव शोधा हा त्यांचा परखड संदेश होता. देव दगडात नाही तो माणसात आहे, असे ते देवकीनंदन गोपाला हे भजन गाताना उदाहरणे देऊन व श्रोत्यांशी संवाद साधून ते स्पष्ट करायचे.

गाडगेबाबांनी फक्त भाषण किंवा कीर्तनाचाच अवलंब केला नाही, तर त्यांनी आपल्या कमाईतून आणि लोकांच्या देणगीतून अनेक धर्मशाळा, अन्नछत्र, वृद्धाश्रम, गो-शाळा आणि रुग्णालय परिसरात धर्मशाळा उभारल्या.मुंबई ,पंढरपुर, नाशिक, पुणे, आळंदी, देहू आणि अमरावती येथे त्यांच्या पुढाकारात धर्मशाळा उभारल्या गेल्या.

मुंबईतील जे.जे. हॉस्पिटल धर्मशाळा (१९५४) सारख्या सामाजिक उपक्रमांत त्यांनी योगदान दिले.मुंबईत वैद्यकीय उपचारासाठी जाणाऱ्या महाराष्ट्रातील तमाम गरीब बांधवांसाठी राहण्याची सोय त्यांनी त्या काळात केली. अनेक ठिकाणी निवारे, धर्मशाळा उभारून गरीब, दलित आणि गरजू लोकांना संरक्षण मिळवून दिले.मानवा मानवातील भेद दूर करत सहजीवनाचा आदर्श दिला.

जातीपाती, अस्पृश्यता, अज्ञानात खितपत पडलेल्या ग्रामीण जनतेला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्याच भाषेत समाज प्रबोधन केले. लोकांना जात-पात, सामाजिक भेदभाव, अस्वच्छता यातून बाहेर काढत कर्मातून आयुष्य घडवण्याची शिकवण दिली. संवादावर त्यांचा विश्वास होता. शिक्षणातूनच सामाजिक सुधारणा होऊ शकते हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना तत्कालीन समाज व्यवस्थेत रुजविण्याचे कार्यही त्यांनी स्वतः केले. शिक्षणाने माणूस किती मोठा होतो यासाठी ते बाबासाहेबांचे उदाहरण समोर बसलेल्या जनतेला द्यायचे. जातीभेदात, चातुर्वर्णात डुंबलेल्या तत्कालीन समाज व्यवस्थेला बाहेर काढण्यासाठीच्या त्यांच्या धडपडीचे बाबासाहेब आंबेडकरांनी देखील कौतुक केले. गाडगेबाबांच्या समाज आणि जातीभेदाविरुद्धच्या कार्याचे महत्त्व बाबासाहेबांनी मान्य केले.गाडगेबाबा त्या काळातील काही थोर व्यक्तिमत्त्वांशी संवाद साधणारे व्यक्ती होते. त्यांच्या कार्याला प्रेरणा आणि समन्वय दोन्ही मिळाले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याशी गाडगेबाबांच्या मैत्री आणि आदराचे संबध होते.भाऊरावांच्या शिक्षण व सामाजिक कार्याचा उल्लेख ते आपल्या कीर्तनात करायचे. भाऊरावांनी गाडगेबाबांच्या निधनावरअतिशय भावनिक संवेदना व्यक्त केल्या होत्या.

डॉ. पंजाबराव देशमुख, इतिहासातील अन्य एक समाज-सेवक आणि राजकीय व्यक्तिमत्त्व, यांच्या कार्यात गाडगेबाबांनी काही प्रमाणात सहकार्य केले आणि त्यांच्या योजना, शिक्षण आणि समाज सुधारणा कार्यक्रमांना पाठिंबा दिला.गाडगेबाबा आणि तुकडोजी महाराज यांच्या विचारधारांमध्ये सामाजिक समता, स्वच्छता आणि ज्ञानविकास अशा मुद्द्यांवर साम्य होते.साने गुरुजी यांच्याशी त्यांचा विशेष स्नेह होता. तर समाज सुधारक प्रबोधनकार ठाकरे यांनी त्यांच्यावर पुस्तक लिहून गाडगे बाबांच्या कार्याला जनतेसमोर आणले होते.

### अंधश्रद्धा, वर्ण आणि सामाजिक कायदा

गाडगेबाबांनी अंधश्रद्धा आणि जातीवादाविरुद्ध सतत भाष्य केले. त्या काळात अनेक भोंदू बाबा, महाराज आणि तीर्थस्थळांची पूजा करून आपले जीवन सुधारेल असा विश्वास ठेवत असताना गाडगेबाबांनी हे स्पष्ट केले की खोटे देव, तीर्थक्षेत्र आणि आचार हे मानवाच्या प्रगतीत व्यत्यय आणतात. देव आणि धर्म यांच्या चौकटीत भारतीय समाज व्यवस्था रसातळाला जाईल आणि त्यातून बाहेर पडल्याशिवाय नवभारताची निर्मिती होऊ शकत नाही. हे ७५ वर्षांपूर्वी या महामानवाने गावागावातील जनतेला समजून सांगण्याचे महत कार्य केले.सामाजिक सुधारणा, सामाजिक उपाय, शिक्षण आणि मानवी मूल्यांचा अवलंब करणे अधिक परिणामकारक आहे,हे त्यांनी सामान्य माणसासोबतच व्यवस्थेला समजावण्याचे धारिष्ट्य दाखविले

गाडगेबाबांनी आपल्या कार्याच्या शेवटच्या काळात ८ नोव्हेंबर १९५६ रोजी मुंबईत एक सार्वजनिक कीर्तन केले.गाडगे बाबांचे शेवटचे भाषण आजही सर्वत्र उपलब्ध आहे. अशिक्षित असणाऱ्या या समाजसुधारकाच्या जात, धर्म, स्वच्छता आणि शिक्षणाबाबतच्या कल्पना किती स्पष्ट होत्या. क्रांतिकारी होत्या. याची जाणीव आजही समाजाला ठेवणे गरजेचे आहे.देशाने अमृत महोत्सवी वाटचाल पूर्ण केल्यानंतरही त्यांचे विचार आजही कालसापेक्ष आहे.

गाडगेबाबांनी आयुष्यभर समाजसेवा केली.मात्र स्वतःच्या नावाने आश्रम, मठ उभारणे त्यांना मान्य नव्हते. ते स्वतः म्हणायचे... "मी कुणाचा गुरु नाही.माझा कुणी चेला नाही"

शेवटी २० डिसेंबर १९५६ रोजी अमरावती जिल्हयातील वलगाव येथे हा महान सुधारक अंतिम प्रवासासाठी प्रस्थान करता झाला.त्यांचा वारसा आजही जिवंत आहे - महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नावाने ‌संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान आणि राष्ट्रीय पातळीवर स्वच्छता व पाण्याच्या पुरस्कार योजना सुरु केल्या आहेत. तसेच अमरावती विद्यापीठाचे नांव संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ठेवण्यात आले आहे, हा . त्यांच्या कार्याचा सन्मान आहे.

**प्रवीण टाके,** उपसंचालक
विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूर ९७०२८५८७७७

# जिल्हा परिषद अभियंता संघटनेचे त्रैवार्षिक अधिवेशन १ मार्चला गोंदियात

**गोंदिया:** -जिल्हा परिषद अभियंता संघटना महाराष्ट्र (राज्यस्तर), जिल्हा शाखा गोंदियाच्यावतीने राज्यस्तरीय त्रैवार्षिक अधिवेशन १ मार्च २०२६ रोजी येथील लकी लॉन गोरेगाव रोड गोंदिया येथे आयोजित करण्यात आले आहे.या अधिवेशनात अभियंत्यांच्या विविध प्रलंबित मागण्या, प्रशासकीय प्रश्न आणि तांत्रिक समस्यांवर चर्चा करुन संघटनात्मक ध्येयधोरणे आणि नवीन कार्यकारिणी निवड तसेच पदोन्नती प्राप्त अभियंते व सेवानिवृत्त अभियंत्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे उदघाटन गोंदिया जि.प.चे मुकाअ एम.मुरुंगनाथम यांच्या हस्ते संघटनेचे राज्य अध्यक्ष सचिन चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री तथा आमदार इंजि. राजकुमार बडोले, संघटनेचे मुख्य सल्लागार सुहास धारासूरकर (परभणी), अति.मुकाअ तानाजी लोखंडे, प्रकल्प संचालक प्रमिला जाखलेकर, उपमुकाअ फरेंद्र कुतीरकर, मधुकर वासनिक, कार्यकारी अभियंता प्रकाश ताकसांडे, सत्यजित राऊत व राकेश चांदेवार उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनात अनंत जगताप व भूमेश दमाहे यांच्यासह सेवानिवृत्त पदोन्नत शाखा अभियंत्याचा सत्कार करण्यात येणार आहे.

या त्रैमासिक अधिवेशनाला राज्य कार्यकारीणीचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार असून २८ फेबुवारीला सायकांळी क्रिडा स्पर्धा व जिल्हा शाखांचे स्वागत करण्यात येणार आहे.या अधिवेशनाला सर्व अभियंत्याने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन गोंदिया जिल्हाध्यक्ष किशोर बन्सोड, राज्य उपाध्यक्ष प्रविण दमाहे, राज्य कार्य.सदस्य धवल सोमलवार, जिल्हा कार्याध्यक्ष टेकराम बिसेन, सचिव महेंद्र खोब्रागडे, कोषाध्यक्ष अनमोल मेश्राम, उपाध्यक्ष देवेंद्र रोडगे, सहसचिव पदमा ठाकरे, सह कोषाध्यक्ष निखील राऊत, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संघटनेचे कार्तिक भगत, धमेंद्र लिल्हारे, राधेश्याम साबळे, सहयोग नेमा आदिंनी केले आहे.

# चंद्रभागा स्मशानभूमीतील शेडची दुरवस्था;नगरपरिषदेचे दुर्लक्ष

**चित्रा कापसे/तिरोडा**-शहरातील चंद्रभागा स्मशानभूमी येथील स्मशान शेडची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शेडची लोखंडी संरचनेला गंज लागला आहे व सिमेंट काम देखील खराब झाले आहे. काही ठिकाणी सिमेंटचे तुकडे खाली पडत असल्याने अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.



स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा नगर पालिका प्रशासनाकडे दुरुस्तीची मागणी केली असल्याचे सांगितले जाते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शेड कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे.

"नगर पालिका प्रशासन मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे काय? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# नागपूरमध्ये आरएसएसच्या विरोधात विशाल महामोर्चा अनेक संघटनाचे लाखो कार्यकर्ते एकवटले

**नागपूर:-** नागपूरमध्ये आरएसएसच्या विरोधात विशाल महामोर्चा काढण्यात आला. इंदौरा मैदानातून या मोर्चाची सूरूवात झाली. नागपूर मधील आरएसएस मूख्यालयावर काढण्यात आलेल्या विशाल महामोर्चाचे वामन मेश्राम व चौधरी विकास पटेल यांनी नेतृत्व केले. नागपूर येथील आरएसएस मुख्यालयावर देशातील विविध सामाजिक, धार्मिक संघटनाचे नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी भारत मुक्ती मोर्चा, बहूजन क्रांती मोर्चा, मूलनिवासी महिला संघ, या सर्व संघटनेच्या कार्यकर्त्यांनी लाखोंच्या संख्येने मोर्चात सहभागी झाले.

या दरम्यान मोर्चात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी आरएसएस व भाजपा सरकार विरोधात घोषणाबाजी केली. मूलनिवासीयोंका नारा है, भारत देश हमारा हैं, ये आजादी झूठी है, देश की जनता भूखी हैं, डीएनए रिपोर्ट काय म्हणते, बामन विदेशी हाय म्हणते, मूलनिवासीयोंका नारा हैं, भारत देश हमारा हैं, ईव्हीएम की जो सत्ता हैं वह लोकतंत्र की हत्या हैं, ये सरकार, वो सरकार, दलाल भडवोंकी सरकार, आरएसएस बीजेपीने क्या किया, देश का सत्यानाश किया, निकलो बाहर मकानोंसे, जंग लढो बेईमानोंसे, ईव्हीएम हटाव, देश बचाव, आर्टीकल १९ का हनन बंद करो, महिलांवरील अत्याचार बंद करा, ओबीसींची जातीनिहाय जनगणना करा, ईव्हीएम से वोट घोटाला नहीं चलेगा, विदेशी ब्राम्हण भारत छोडो, गली गली में शोर है, चूनाव आयोग चोर हैं, सबसे बडा आतंकवादी, ब्राम्हणवादी ब्राम्हणवादी, ब्राम्हणवाद ने क्या किया, देश का सत्यानाश किया, अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

राष्ट्रीय सीख मोर्चाचे कार्यकर्ते ही या विशाल महारॅलीला उपस्थित होते. यातील एका कार्यकर्त्याने सांगितले की, सर्वांना बरोबरीचा अधिकार मिळाला पाहिजे, कोणावरही अन्याय होता कामा नये. देशातील मूसलमानांची मॉब लिचिंग थांबली पाहिजे, मनूवादी लोकांच्या रीतीरिवाज व प्रथामूळे देशात ब्राम्हणवाद वाढत आहे. आज अजूनही या देशात काही प्रथा जीवंत आहेत, याचा अर्थ ब्राम्हणवाद जीवंत आहे.

ते पुढे म्हणाले की, या देशातील ब्राम्हणवादी लोक नरेन्द्र मोदी व अमित शहाला पुढे करून देशात जातीयवाद वाढवत आहे. हिंदूत्वाच्या नावावर ओबीसी, एससी, एसटी, आणि मायनॉरिटीच्या लोकांवर अन्याय ,अत्याचार करत आहेत. आरएसएस व बीजेपीचे लोक मोदी-शहाच्या नावावर ब्राम्हणवाद जीवंत ठेवत आहेत. हिंदूत्वाच्या नावावर जातीजातीत भांडणे लावण्याचे काम करत आहे. आज देशात ब्राम्हणवादाच्या नावावर एसी,एसटी, ओबीसी यांच्यावर अन्याय होत आहे. मोहन भागवत हा आरएसएसच्या नावावर देशात ब्राम्हणवाद वाढवण्याचे काम करत आहे. आजही आरएसएसच्या इशार्यावर भारतात हिंदू धर्माच्या नावाखाली ब्राम्हणवाद जोपासला जात आहे. आता आम्ही ब्राम्हणवाद पसरवणार्यांना सोडणार नाही. बीजेपी व आरएसएसचे जे लोक चुकीचे काम करत आहेत, त्यांना आम्ही सोडणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

ते म्हणाले की, आता देशातील ओबीसी एससी एसटी आणि मायनॉरिटीच्या लोकांमध्ये जनजागृती झाली आहे. आम्ही आमच्या मागण्या व हक्क आणि अधिकारांसाठी आरएसएसच्या मुख्यालयावर महामोर्चा काढला आहे. मागच्या वेळेस या मोर्चासाठी नागपूरात ५ लाख लोक आले होते. आता या मोर्चासाठी संपुर्ण देशभरातून १० लाख लोक येणार आहेत. देशभरातून सामाजिक, धार्मिक संघटनाचे नेते, कार्यकर्ते आरएसएस मुख्यालयावर महामोर्चासाठी आले आहेत.

भारतात दरवेळी भारत मुक्ती मोर्चा व बामसेफ संघटनाचे राष्ट्रीय अधिवेशन होत असते. यावेळेस ओडिसा राज्यातील कटक येथे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित केले होते. बामसेफ व भारत मुक्ती मोर्चा या सामाजिक संघटनांनी सर्व कार्यक्रमाच्या कायदेशीर परवानग्या घेतल्या होत्या. मात्र, कटक प्रशासनाने आरएसएस व बीजेपी सरकारच्या दबावामूळे राष्ट्रीय अधिवेशनाची परवानगी अचानक रद्द केल्यामूळे अधिवेशन होऊ शकले नाही. भारतीय संविधानाने आम्हाला आमचे हक्क आणि अधिकार दिलेले



आहेत. आमच्या संविधानातील हक्क व अधिकारांसाठी नागपूरात आरएसएस मुख्यालयावर या विशाल मोर्चासाठी आलो आहोत. आम्हाला संविधानाने मोर्चा काढण्याचा व आंदोलन करण्याचा अधिकार दिला आहे. या देशात आमच्या संवैधानिक हक्क व अधिकारांचे उल्लंघन होत असेल, तर आम्ही शांत बसणार नाही, असा इशारा राष्ट्रीय सिख मोर्चाच्या पदाधिकार्यांने दिला.

उत्तरप्रदेशातील मिर्जापूरचे भारत मूक्ती मोर्चा कार्यकर्ते म्हणाले की, आमच्या मौलिक अधिकाराचे आरएसएस भाजपा सरकारने हनन केले आहे. २ महिन्यांपूर्वी राष्ट्रीय अधिवेशन ओरिसा येथे करण्यासाठी परवानगी मिळाली होती, परंतू अचानक ओडिसा सरकारने अधिवेशनाची परवानगी नाकारली आहे. आम्ही सर्व कायदेशीर परवानगी घेऊनच देशभरात कार्यक्रम आयोजित करत असतो. आमच्या संघटनेने सर्व परवानगी घेतली असताना ही ओडिसा सरकारने आरएसएस व भाजपा सरकारच्या दबावाखाली अधिवेशनाची परवानगी रद्द केली आहे.

ते पुढे म्हणाले की, या अधिवेशनासाठी करोडो रूपये खर्च करून तयारी करण्यात आली होती. त्यामूळे नागपुर येथे आज आरएसएस मूख्यालयाला घेराव घालण्यासाठी भारतातील ३१ राज्यांमधून, ७०० जिल्ह्यांमधून, ६,००० गावांमधून लोक येणार आहेत. आमच्या अधिवेशनाला रोखण्याचे काम आरएसएस प्रणित बीजेपी सरकारने केले आहे. नागपूर येथील इंदौरा मैदानात उत्तरप्रदेशातील आजमगड, मेरठ, मिर्जापूर, येथून लोक आले आहेत, असे भारत मुक्ती मोर्चाचे मिर्जापूर येथील पदाधिकारी म्हणाले.

यवतमाळमधील एक कार्यकर्ता म्हणाला की, ओडिसा राज्यातील कटक येथे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित केले होते. आरएसएस व भाजपाच्या दबावामूळे ओडिसा राज्यसरकारने अचानक अधिवेशन थांबवले आहे. त्यामूळे हा नागपूर मध्ये आरएसएसच्या विरोधात मोर्चा काढला आहे. ओबीसी जातीय जनगणनेवर अधिवेशनात चर्चा होणार होती. त्यामूळें या देशातील लोकशाही वाचवण्यासाठी आम्ही लोक नागपूर येथे आलो आहोत. याच इंदौरा मैदानावर येथून मागे ही देशभक्ती व संविधान बचाव मोर्चा निघाले आहेत, तर आजचा हा मोर्चा आमच्या हक्क व अधिकार वाचवण्यासाठी आहे. तर भारतीय संविधान वाचवण्यासाठी आम्ही येथे मोर्चासाठी आलो आहोत. असे पिछडा वर्ग मोर्चाच्या पदाधिकार्यांनी सांगितले.

मध्यप्रदेशातील बैतूलचे एक कार्यकर्ते म्हणाले की, जेव्हा देशात अराजकता वाढते तेव्हा देशातील तरूण पिढी जागृत होऊन आंदोलनात सामील होते. येथून पुढे ही जबाबदारी तरूण पिढीची आहे. आजही तरूण पिढी आंदोलनात येत आहे. आज नागपूरमध्ये आरएसएसच्या विरोधात यूवा पिढी मोर्चासाठी आली आहे. एससी, एसटीचे हक्क व अधिकार संपविण्याची परिस्थिती येत असेल तर आम्ही तरूण पिढी पुढे येईल. बहुजन महापूरूषांनी सर्व समाजासाठी काम केले आहे. या देशात फुले-शाहू-आंबेडकर-कांशीराम या महामानवांनी बहुजन समाजासाठी लढाई लढली आहे. स्वतंत्रता, समता, बंधूता, न्याय या तत्वावर काम करणारे आमचे महापूरूष होते. त्याच मार्गाने आम्ही काम करत आहोत. आमच्या हक्क व अधिकाराला वाचविण्यासाठी आम्ही या महामोर्चाला आलो आहोत. या देशात बामसेफ व भारत मुक्ती मोर्चा या सामाजिक संघटना देशभरात महापूरूषांच्या विचारांसाठी दिवसरात्र काम करत आहेत. या संघटना देशपातळीवर सर्व गावपातळीवर, शहरी भागात, एससी, एसटी, ओबीसी, आणि मायनॉरिटीच्या लोकांमध्ये जनजागृती व्हावी म्हणून काम करत आहेत. आम्ही ओबीसी एससी, एसटीचे सर्व लोक मध्यप्रदेशातून येथे नागपूरला मोर्चासाठी आलो आहोत असे ते म्हणाले.

पंजाब सिख मोर्चाचे के एफ खालसा म्हणाले की, ओडिसा राज्यातील कटक येथे २००८ साली पहिले एक अधिवेशन झाले आहे. आताही २०२५ डिसेंबर मध्ये राष्ट्रीय अधिवेशन होणार होते. भाजपा व आरएसएसच्या दबावामूळे ओडिसा सरकारने अधिवेशनाची परवानगी अचानक २४ तास आधी रद्द केली आहे. यामूळे वामन मेश्राम यांनी ४ चरणात आंदोलन करण्याची घोषणा केली. त्यानूसार आज ४ थ्या चरणातील आंदोलन हे नागपूरच्या आरएसएस मूख्यालयाला घेराव घालण्यासाठी व आरएसएस व बीजेपी सरकारला इशारा देण्यासाठी होत आहे. यापुर्वी ही आरएसएसच्या मूख्यालयावर भारत मूक्ती मोर्चा या सामाजिक संघटनने मोठा मोर्चा काढला होता. आजच्या या मोर्चासाठी देशसभरातून १० लाख लोक येणार आहेत.

आजही आरएसएस व भाजपा सरकार या देशात जातीजातीत भांडणे लावत आहेत. ओबीसी, एससी, एसटी या बहूजन समाजाला त्यांच्या हक्क अधिकारापासून वंचित ठेवत आहे. शीख, मूसलमान, बौध्द या लोकांच्यात आपापसांत भांडणे लावत आहेत. आरएसएस व भाजपा हिंदुराष्ट्राच्या नावावर देशभरात ओबीसी, एससी, एसटी यांच्यामध्ये वाद उभा करत आहे. देशातील बहूजन समाजाच्या अधिकारांचे उल्लंघन करत आहे. युजीसीच्या विषयावरून देशात मोठा वाद उभा केला आहे. हिंदूराष्ट्राच्या नावावर देशातील तरूणांची माथी भडकवण्याचे काम आरएसएस-भाजपा करत आहे. म्हणून आज हा नागपूर येथे आरएसएस मूख्यालयावर विशाल महामोर्चा काढला आहे. देशातील भारत मुक्ती मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा व देशातील ओबीसी, एससी, एसटी सर्व बहुजन समाजाचे लोक या मोर्चात आले आहेत. देशातील २०० सामाजिक संघटनांनी या मोर्चासाठी समर्थन दिले आहे, असे पंजाब सिख मोर्चाचे के एफ खालसा म्हणाले.

उत्तरप्रदेश मूलनिवासी महिला संघटनेच्या कार्यकर्त्या म्हणाल्या की, ओडिसा येथे भारत मुक्ती मोर्चा व बामसेफ संघटनेचे कटक येथे अधिवेशन होणार होते. परंतू आरएसएस भाजपा सरकारने ओडिसा येथे अधिवेशन होऊ दिले नाही. संविधानातील हक्क व अधिकरावर आरएसएस व बीजेपी सरकार गदा आणून आमच्या संवैधानिक हक्क आणि अधिकाराचे उल्लंघन करत आहे. या देशात अधिवेशन थांबवून या आरएसएस प्रणित भाजपा सरकारने गैरसंविधानिक काम केले आहे. राष्ट्रीय अधिवेशनाच्या सर्व कायदेशीर परवानग्या घेतल्या होत्या. व या अधिवेशनासाठी करोडा रूपये खर्च केले होते. तरीही हे अधिवेशन ओडिसा सरकारने होऊ दिले नाही. आरएसएस प्रणित भाजपा सरकार आमच्या हक्क व अधिकाराचे उल्लंघन करत आहे. त्यामूळे चौथ्या चरणातील आंदोलन हे नागपूर येथे होत आहे. नागपूर मधील आरएसएसच्या मूख्यालयाला घेराव घालण्यासाठी तामिळनाडू, तेलंगणा, केरळ, कर्नाटक या राज्यातील मूलनिवासी असलेल्या ओबीसी ,एससी, एसटी समाजाचे लोक व मूलनिवासी महिला कार्यकर्त्या या विशाल महामोर्चासाठी उपस्थित झाल्या आहेत, असे त्या म्हणाल्या.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार,दि.२५ फेब्रुवारी २०२६ 

# रस्ता तयार करताना प्रशासनाला वळण मार्गाचा विसर

**तिरोडा:-** तालुक्यातील परसवाडा ते बोरा या रस्त्याची तीन तेरा वाजले होते. रस्त्यावरील खड्ड़े अपघाताला आमंत्रण देत असल्याने नागरिकांनी अनेकदा तक्रार करून रस्ता दुरूस्तीची मागणी केली. यासाठी गावकऱ्यांनी आंदोलनही केले. त्यातच जाग आलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाने परसवाडा-बोरा मार्गाचे बांधकाम हाती घेतले आहे. या मार्गावर असलेल्या पुलाचे नुतनीकरण केले जात आहे. यासाठी विभाग व कंत्राटदाराकडून रस्ता बंद करण्यात आला. परंतु, पर्यायी रस्ता तयार करून देण्यात आला नाही. यामुळे शेतकरी, नागरीक व विद्यार्थ्यांची कोंडी झाली आहे. या प्रकाराने प्रशासनाला वळण मार्गाचा विसर पडला का? अशी चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, रस्ता बांधकाम करताना वळण मार्गाचा पर्याय असतो. त्यासाठीही निधी मंजूर केला जातो. मात्र सदर मार्गाचे काम होताना वळण मार्ग तयार करण्यात आला नसल्याने अंदाज पत्रकावर गावकऱ्याकडून प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहेत.

तिरोडा परसवाडा-बोरा तालुक्यातील हा मार्ग परिसरातील अनेक गावांसाठी वदर्ळीचा प्रमुख रस्ता आहे. सोनेगाव, डब्बेटोला, बोरा येथील नागरिक तथा विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यासह इतर कामाकरिता ये-जा करावी लागते. मात्र हा रस्ता खड्डेमय झाल्याने परिसरातील गावातील नागरिकांची वहिवाट खडतर झाली होती. खड्ड्यातून वाट काढून नागरिकांना रहदारी करणे भाग



पडत होते. दरम्यान परसवाडा, बोरा येथील नागरिकांनी अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारपूर्ण विनंती करून रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केली. यासाठी आंदोलन देखील केले. दिर्घ प्रतिक्षेनंतर अखेर विभागाला जाग आली. साबां विभागाकडून रस्ता बांधकामाचा मुहूर्त काढण्यात आला. त्यानुरूप कामाला सुरूवात झाली असून या मार्गावरील पुलाचे नुतनीकरण केले जात असल्याने कंत्राटदाराने रस्ता बंद केला. रस्ता बंद करताना वदर्ळ बाधित होवू नये, याकरीता पर्यायी (वळण मार्ग) तयार करणे बंधनकारक असते. यासाठी अंदाजपत्रकात निधीची तरतूद केली जाते. परंतु, कंत्राटदाराने वळण मार्ग तयार न करताच रस्ता बंद केल्याने परिसरातील गावातील वाहतूक पूर्णतः बंद झाली आहे. यामुळे शेतकरी, नागरीक व विद्यार्थ्यांची कोंडी झाली असून दूरअंतर कापून प्रवास करणे भाग पडत आहे. या प्रकारामुळे साबां विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून अंदाजपत्रक तयार करताना अधिकाऱ्यांना वळण मार्गाचा विसर पडला का? असा प्रश्न गावकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. तर दुसरीकडे वळण मार्ग तयार न करताच निधीची परस्पर विल्हेवाट लावण्यासाठी सोयीस्कर आखलेला डाव असल्याची शंकाही गावकरी व्यक्त करु लागले आहेत. चौकशी करून त्वरित वळण मार्ग तयार करून देण्यात यावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# उमेद अंतर्गत कर्जफेडीत गोंदिया जिल्हा राज्यात अग्रेसर

## जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर, पत्रपरिषदेत दिली माहिती

**गोंदिया :-** उमेद अंतर्गत कर्जफेडीत गोंदिया जिल्हा राज्यात प्रथम असल्याची माहिती आज जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी दिली. गोंदिया जिल्ह्यातील महिलांनी बचत गटाअंतर्गत घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्याचे प्रमाण राज्यात अव्वल असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) च्या वतीने 'पलाश'मिनी सरस भव्य प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले ,त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रमिला जाखलेकर उपस्थित होत्या.



श्री. भेंडारकर पुढे म्हणाले, केंद्र शासनाच्या लखपती दीदी उपक्रमाच्या माध्यमातून उमेद अंतर्गत जिल्ह्यात वार्षिक एक लाख रुपयांहून अधिक उत्पन्न मिळवणाऱ्या महिलांची संख्या १ लाख ४७ हजार २२५ आहे. नवीन उद्योजक तयार करण्यामध्ये सुध्दा गोंदिया जिल्हा राज्यामध्ये अग्रेसर असून आजपर्यंत नवीन बिगरशेती आधारित १४ हजार ३५० उद्योजक तयार करण्यात आलेले आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. गोंदिया जिल्ह्यात वसंत ऋतु मध्ये पलाशची फुल मोठ्या प्रमाणात आढळतात त्यामुळे या मिनी सरस ला 'पलाश' नाव देण्यात आलेले आहे.

# अतिदुर्गम भागात आरोग्य सेवेला समर्पित अनिता परकीवार



**सालेकसा:-** अनिता परकीवार आरोग्यसेविका म्हणून जमाकुडो आरोग्य उपकेंद्र अंतर्गत एकूण ११ गावांची जबाबदारी सांभाळत आहेत.यात जमाकुडो, विचारपूर, टोयागोंदी, बोइरटोला, चौकीटोला, बडटोला, दलदलकुही, धनेगाव, भर्रीटोला, पठाणटोला आणि रफारीटोला या गावांचा समावेश आहे.

याशिवाय दरेकसा उपकेंद्रात आरोग्य सेविका नसल्याने तेथील १५ गावांचा अतिरिक्त भारसुद्धा त्यांच्यावर आहे. यामध्ये मुरकुटडोह आणि दंडारीसारख्या अतिदुर्गम व संवेदनशील भागातील गावांनासुद्धा भेट देत आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्र, दरेकसा येथे प्रसुती करण्यासाठी त्यांनाच बोलावले जाते. त्यामुळे उपकेंद्र बाहेरील प्रसुती रुग्णांची जबाबदारीसुद्धा सांभाळत आहेत

मागील १६ वर्षात जवळपास ८०० महिलांची यशस्वी प्रसुती त्यांनी केली आहे. यात ९० टक्के प्रसुती उपकेंद्रात सामान्यरित्या केल्या. लोकांच्या आरोग्यासाठी सतत सेवेत हजर राहात असल्याने गरीब आदिवासी महिलांच्या त्या लाडक्या आरोग्यसेविका बनल्या आहेत.

**एवढे करूनही कंत्राटी तत्त्वावरच**

अतिदुर्गम, डोंगराळ व नक्षलग्रस्त म्हणून ओळख असलेल्या सालेकसा तालुक्यात जेथे माणूस आरामाची नोकरी करण्यासाठी येत नाही. तेथेच मागील १६ वर्षांपासून परकीवार फिल्डवर्क करीत आहेत. आपले जीवन त्यांनी वाहून दिले आहे. असे असतानाही १६ वर्षांची सेवा झाली तरी त्या आजही कंत्राटी पद्धतीने कर्तव्य बजावत आहेत. स्वतःच्या प्रसुतीच्या वेळी त्यांना मातृत्व रजा घेण्याचा लाभ मिळाला नाही. त्यामुळे एक महिन्याचे बाळ असताना त्या पुन्हा सेवेत हजर झाल्या.

# बिअर बारविरोधात धोबाटोलावासी आक्रमक

## संतप्त गावकऱ्यांकडून बारची तोडफोड; ३० जणांवर गुन्हा दाखल

**गोंदिया :-** उचेपूर ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या धोबाटोला गावात अरमान बिअर बारविरोधात गावकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेत बारची तोड्फफोड केल्याची घटना १८ फेब्रुवारी रोजी घडली. या प्रकरणी चिचगड पोलिसांनी ३० जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

तालुक्यातील उचेपूर ग्रामपंचायतीअंतर्गत धोबाटोला गावात अरमान बिअर बारविरोधात गावकऱ्यांचे मागील ३ महिन्यांपासून आंदोलन सुरू आहे. यात काही ग्रामस्थांकडून उपोषणही करण्यात येत आहे.



दरम्यान, बुधवार, १८ फेब्रुवारी रोजी उचेपूर ग्रामपंचायतीत विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बिअर बार सुरू ठेवायचा की बंद करायचा? यासाठी हात उंचावून मतदान करण्यात येत होते. सायंकाळी पाच वाजेपर्यंत सुरू असलेल्या मतदानादरम्यान बारमालकाने ग्रामसभेत हस्तक्षेप केला.

हस्तक्षेप होत असल्याचे पाहून गावकऱ्यांनी संतप्त होत आमची सही व मतदान प्रशासनिक अधिकारी घेत नसल्याचा ठपका ठेवत गोंधळ घातला. यानंतर थेट अरमान बिअर बारकडे मोर्चा वळवत बारमध्ये घुसून फर्निचरची तोड्फफोड केली. दारूच्या बाटल्या फोडल्या.

या प्रकरणी चिचगड पोलिसांनी ३० गावकऱ्यांवर गुन्हा दाखल केला असून, १२ जणांना अटक केली आहे. अटक केलल्या आरोपींमध्ये काही महिलांचाही समावेश आहे. या घटनेनंतर गावात तणावाचे वातावरण आहे.

# आमदार रहांगडालेच्या प्रयत्नाने नुकसानग्रस्त शेतक-यांना २१ कोटी रुपयांची मदत मंजूर



**तिरोडा:-** तिरोडा तालुक्यात माहे सप्टेंबर व ऑक्टोंबर महिन्यात अवकाळी पाऊस व नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना आर्थिक दिलासा मिळावा यासाठी तिरोडा गोरेगाव विधानसभेचे आमदार विजय रहांगडाले यांनी सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा केला होता. त्यांच्या विशेष प्रयत्नांना यश येऊन नुकसानग्रस्त शेतक-यांसाठी २१.०० कोटी रुपयांची भरपाई मंजूर करण्यात आली आहे.

यामध्ये प्रामुख्याने सप्टेंबर महिन्यात एकूण २३९५ शेतकरी एकूण क्षेत्र ८३७.५५ हेक्टर व ऑक्टोंबर महिन्यात २६०५२ शेतकरी एकूण क्षेत्र ११०५३.८७ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते. मंजूर करण्यात आलेली ही रक्कम संबंधित शेतक-यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याची प्रक्रिया सुरू असून अनेक शेतक-यांच्या खात्यात भरपाई जमा देखील झाली आहे. या मदतीमुळे नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.आमदार विजय रहांगडाले यांनी प्रशासनाशी सातत्याने बैठक घेत, पंचनामे लवकर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या व पूर्ण करून प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यासाठी पाठपुरावा केला होता.

शेतक-यांना वेळेत मदत मिळावी हा यामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा असून संकटाच्या काळात शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. मंजूर झालेली ही मदत शेतक-यांना पुन्हा उभारी देणारी ठरेल, असा विश्वास आमदार रहांगडाले यांनी व्यक्त केला.या निर्णयाबद्दल परिसरातील शेतक-यांनी समाधान व्यक्त करत आमदार विजय रहांगडाले यांचे आभार मानले आहेत.

# खैरबोडी ग्रा.पं.प्रशासनाकडून निधीचा अपहार

**तिरोडा :-** तालुक्यातील खैरबोडी येथील ग्रामपंचायतच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध लाभाच्या योजना तसेच घरकुल योजनेमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप उपसरपंच महेश ठाकरेसह ५ सदस्यांनी केला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

खैरबोडी ग्रामपंचायतचे उपसरपंच ठाकरे व सदस्यांनी केलेल्या आरोपीनुसार, ग्रामपंचायत प्रशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या वैयक्तीक व इतर योजनांमध्ये मोठा गैरव्यवहार झाला आहे. सरपंच यांनी पतीच्या नावावर घरकुल मंजुर करून स्वतः लाभ घेतला आहे. गुहांचा गोठा योजनेचीही लाभ कुटुंबाच्या नावावर घेण्यात आला आहे. सार्वजनिक वाचनालयात साहित्य खरेदीमध्ये गैरव्यवहार करण्यात आला आहे.एवढेच नव्हेतर वाचनालयाला गोदामाचे स्वरुप देण्यात आले आहे, व्यायाम शाळेकरिता साहित्य खरेदीसाठी आलेली रक्कम परस्पर काढण्यात आली आहे. वृक्षलागवड, सार्वजनिक ठिकाणी शौचालय बांधकाम न करता निधीची उचल करण्यात आली आहे असा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी सखोल चौकशी करून सरपंच विद्या टेंभरे यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही आरोपकर्त्यांनी केली आहे.

**ग्रामपंचायत प्रशासनाकडून करण्यात आलेली सर्व कामे पारदर्शक आहेत. योजनांच्या निकष व अटी-शर्तीनुसार लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे, आरोपकर्त्यांनी या संदर्भात माहितीचा अधिकारी अधिनियमांतर्गत कागदपत्रेही मागितली ते सुद्धा पुरविण्यात आली आहेत. आरोपकर्ते हेतु पुरस्पर व स्थानिक राजकारण करून बिनबुडाचे आरोप करीत आहेत. आरोपकर्त्यांच्या मागणीनुरुप कोणत्याही चौकशीला समोर जाण्यात आपण तयार आहोत. आरोप सिद्ध न झाल्यास मानहानीचा दावा देखील आपण करू.**

**- विद्या विनोद टेंभरे, सरपंच, ग्रा. पं. खैरबोडी**

### शेतकरी सभासदांनी आवश्यक माहिती उपलब्ध करुन द्यावी- जिल्हा उपनिबंधकांचे आवाहन

**गोंदिया :-** शासनाने राज्यातील शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने प्रस्तावित कर्ज निवारण योजने संदर्भात माहिती मागविली आहे. याअनुषंगाने थकीत कर्जदार सभासदांची माहिती संकलीत करुन विहीत नमुना प्रपत्र अ व ब मध्ये तयार करण्याचे काम संबंधित प्राथमिक कृषी पत पुरवठा सेवा सहकारी संस्था तसेच गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा स्तरावर सुरु आहे.

याअनुषंगाने सेवा सहकारी संस्थांचे थकीत सभासदांच्या कर्ज खात्याविषयी व इतर अनुषंगिक माहिती संकलीत करण्याचे काम संस्था पातळीवर सुरु आहे. तथापि सेवा सहकारी संस्थांचे थकीत कर्ज असलेल्या बहुतांश सभासदांनी संबंधित सहकारी संस्थेच्या सचिवाशी संपर्क करुन त्यांचे आधार कार्ड, फार्मर आय.डी. व इतर आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, त्यामुळे सदर माहितीचे संकलन संस्था पातळीवर करता आले नाही.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार जपणे हीच खरी शिवजयंती




**सडक अर्जुनी:-** छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य हे जनतेचे, बहुजनांचे आणि सर्वधर्मसमभाव जपणारे होते. त्यांनी सर्व धर्माचा आदर राखत न्याय, स्वाभिमान आणि लोककल्याण यावर आधारित आदर्श राज्यकारभार उभा केला. पराक्रमी योद्धा म्हणून त्यांची कीर्ती जगभर पसरली तर जनतेचा राजा म्हणून ते आजही प्रत्येकाच्या हृदयात विराजमान आहेत. शिवजयंती साजरी करताना केवळ उत्सव न साजरा करता त्यांच्या विचारांचे जतन आणि संवर्धन करणे अधिक महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन आ. राजकुमार बडोले यांनी केले.

तालुक्यातील घोटी येथे राजे ग्रुपतर्फे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज जयंती सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी आ. बडोले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून अभिवादन केले.

यावेळी माजी आ. दिलीप बन्सोड, पंचायत समिती सभापती चेतन वडगाये, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अविनाश काशिवार, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक गंगाधर परशुरामकर, भाजप जिल्हा महामंत्री प्रशांत शहारे, राजू पटले, दिनेश कोरे, सुधाकर ब्राम्हणकर उपस्थित होते.

### इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विविध पुरस्कारासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**गोंदिया :-** इतर मागास विकास विभागांतर्गत कार्यरत इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत शासन निर्णयानुसार महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार, क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार आदी पुरस्कारांसाठी पात्र व इच्छुक व्यक्ती तसेच संबंधित समाजाच्या उत्थानासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था यांच्याकडून दि.२१ फेब्रुवारीपर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले होते. पुरेसे अर्ज प्राप्त नसल्यामुळे विभागातर्फे मुदतवाढ करण्यात आलेली आहे आता ही मुदत पुढील दहा दिवस असणार आहे. तरी नागरिकांनी पुरस्कारासाठी नामांकन करावे, असे आवाहन विभागाच्या वतीने करण्यात आलेले आहे. अर्जदार व्यक्ती/संस्था महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जदाराने संबंधित समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अथवा अन्य क्षेत्रातील उत्थानासाठी सलग व उल्लेखनीय स्वरुपाचे कार्य केलेले असावे.




# कालव्याअभावी शेती सिंचनाला ब्रेक

## ३३८ प्रकल्पग्रस्तांचे झाले पुनर्वसन

**तालुक्यातील कलपाथरी मध्यम प्रकल्पांतर्गत येणाऱ्या ५५६.१४ हेक्टर बाधित क्षेत्राच्या जमीन अधिनियमांतर्गत २४ फेब्रुवारी २००० रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात आली. अधिग्रहण नियमानुसार बाधित क्षेत्रातील ३ गावांच्या ३३८ खातेदारांना गोरेगाव नगराच्या शेजारी भूखंड वाटप करून त्यांचे पुनर्वसन करण्यात आले.**

**गोरेगाव:-** सिंचन प्रकल्पासाठी शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहित करण्यात आली. प्रकल्प देखील पूर्ण झाला. मात्र अद्यापही २४ वर्षांचा काळ लोटून कालव्यांचे बांधकाम पूर्ण झाले नाही. परिणामी शेतकऱ्यांना सिंचनापासून वंचित राहावे लागत आहे. हा सिंचन प्रकल्प केवळ दिखावा ठरल्याचा आरोप आता शेतकऱ्यांकडून होत आहे. तातडीने संपूर्ण क्षमतेने सिंचनाची व्यवस्था करण्यात यावी. अन्यथा आमची जमीन आम्हाला परत करावी, अशी हाक शेतकऱ्यांकडून देण्यात आली आहे.




गोरेगाव तालुक्यातील कलपाथरी प्रकल्पाची १९९९-२००० या वर्षात पायभरणी करण्यात आली. हे प्रकल्प १९१५ हेक्टर सिंचन क्षमतेचे राहणार, असे दिव्य स्वप्नही दाखविण्यात आले. या प्रकल्पाच्या उभारणीवर आजपावेतो कोट्यवधींचा निधी खर्च करण्यात आला.या अपूर्ण प्रकल्पातून फक्त ५०० हेक्टर क्षेत्र जमिनीला सिंचनाची सोय होत आहे. गोरेगाव, सडक अर्जुनी, देवरी, सालेकसा या तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचनाची सोय व्हावी, या उद्देशाने गोरेगाव तालुक्यातील कलपाथरी मध्ये २००० मध्ये

सिंचन प्रकल्पाची पायभरणी करण्यात आली. १९१५ हेक्टर क्षेत्राला सिंचनाची सोय होईल, एवढ्या क्षमतेचे प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करण्यात आली. दरम्यान, कलपाथरी प्रकल्पासाठी कलपाथरीसह परिसरातील गावाच्या शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहीत करण्यात आली. त्याचप्रमाणे कलपाथरी गावाचे पुनर्वसन करण्यात आले. मात्र, २४ वर्षाचा काळ लोटूनही कलपाथरी मध्यम प्रकल्प आजपावेतो अंधातरीच पडून आहे. या प्रकल्पाने ज्या गावांना पाणीपुरवठा करायचा होता. ती गावे भू-तलापासून उंचीवर असल्याने त्या ठिकाणी कालव्याचे बांधकाम करण्यात आले. झालेले बांधकाम दुरवस्थेत आले आहे. त्यामुळे १९१५ हेक्टर क्षमतेपैकी फक्त ५०० हेक्टर क्षेत्राला आजघडीला सिंचनाची सोय होत आहे. तर दुसरीकडे या प्रकल्पापासून क्षेत्रात हरीतक्रांती घडून येईल, असे दिव्यस्वप्न पाहणारे शेतकरी अद्यापही प्रकल्पाच्या पूर्णत्वास येण्याची प्रतीक्षा करीत आहेत.

# आरोग्य केंद्र कवलेवाडा व ग्रामीण रुग्णालय देवरीला वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार




**गोरेगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र कवलेवाडा यांनी जिल्ह्यात वर्ष २०२५-२६ मध्ये प्रसुती,कुटुंबकल्याण पुरुष/स्त्री शस्त्रक्रिया व आरोग्य निर्देशकांमध्ये ग्रामीण भागात उत्कृष्ट आरोग्य सेवा बजावत असून तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ.स्नेहा भावे व त्यांची टीम त्यात समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, आरोग्य सहायिका, आरोग्य सहाय्यक, फार्मासिस्ट, आशा सेविका, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आशा गट प्रवर्तक यांच्या एकत्रित टीमवर्कमुळे आरोग्य संस्थेला राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे.**

**- डॉ.अभिजीत गोल्हार, जिल्हा आरोग्य अधिकारी**

**गोंदिया:-** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत आरोग्यमंत्री ना. प्रकाश आबिटकर यांचे संकल्पनेतुन यावर्षी जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अधिपत्याखालील असणाऱ्या आरोग्य संस्थाना वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान २०२६ पुरस्काराने (दि.२२) मुंबई येथे सन्मानित करण्यात आले.यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा शल्यचिकित्सक गटामध्ये ग्रामीण रुग्णालय देवरी व जिल्हा आरोग्य अधिकारी गटात गोरेगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र कवलेवाडाला आरोग्य रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राज्यस्तरीय सोहळ्याल राज्यातील आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे आरोग्य संस्था,जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा शल्य चिकित्सक,वैद्यकीय अधिक्षक ,वैद्यकीय अधिकारी,सर्जन,आशा सेविका यांचा सत्कार सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर व (सार्वजनिक आरोग्य) राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांचे हस्ते गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.यावेळी अभियानाचे आयुक्त व अभियान संचालक डॉ.कादंबरी बलकवडे,संचालक आरोग्य सेवा(मुंबई) डॉ.नितीन अंबाडेकर,संचालक आरोग्य सेवा(पुणे) डॉ.विजय कंदेवाड,सार्वजनिक आरोग्य विभाग सचिव डॉ.निपुन विनायक,सचिव ई.रविंद्रन यांचे सह राज्यस्तरावरील प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

गोंदिया जिल्ह्यातील अतिदुर्गम देवरी तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय देवरी यांची जिल्हा शल्य चिकित्सक गट तर ग्रामीण भागात जिल्हा आरोग्य अधिकारी गटात उत्कृष्ट आरोग्य सेवा दिल्याबद्दल गोरेगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र कवलेवाडाला वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार देण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्र कवलेवाडाच्या वतीने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार व वैद्यकीय अधिकारी डॉ.स्नेहा भावे यांनी तर ग्रामीण रुग्णालय देवरीच्या वतीने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पुरुषोत्तम पटले व वैद्यकीय अधिक्षक डॉ.गगन गुप्ता यांनी पुरस्कार स्विकारला.




**देवरी तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय देवरी यांनी बाह्यरुग्ण सेवा, आंतर रुग्ण सेवा, मेजर व मायनर शस्त्रक्रिया,प्रसुती,सिझेरियन तसेच आयुष्यमान भारत डिजिटल मिशन अंतर्गत आरोग्य निर्देशकांत वैद्यकीय अधिक्षक डॉ.गगन गुप्ता व त्यांचे टिम त्यात वैद्यकीय अधिकारी,स्टाफ नर्स,स्टाफ ब्रदर यांच्या एकत्रित टीमवर्कमुळे आरोग्य संस्थेला राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे.**

**-डॉ.पुरुषोत्तम पटले,जिल्हा शल्यचिकित्सक**

दोन्ही आरोग्य संस्थाना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याने जिल्ह्याचे नाव लौकीक उंचाविले आहे.उपलब्ध साधन सामुग्री व मनुष्यबळात त्यांनी दिलेल्या उत्कृष्ट आरोग्य सेवेबद्दल जिल्हाधिकारी प्रजित नायर,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंम,जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर,उपाध्यक्ष सुरेश हर्षे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पुरुषोत्तम पटले,अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.तृप्ती कटरे,सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अरविंदकुमार वाघमारे,जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.रोशन राऊत,गोरेगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ.विनोद चव्हाण यांनी संस्थेतील आरोग्य कर्मचार्यांचे अभिनंदन केले आहे.

# जिल्ह्यातील ४१ हजार ८०० शेतकऱ्यांना मिळू शकतो कर्जमाफी योजनेचा लाभ !

**गोंदिया ::-** शासनाने राज्यातील शेतीक्षेत्रात व शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आपातकालीन, दीर्घकालीन उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने कर्ज निवारण योजनेसंदर्भात माहिती मागितली आहे. या अनुषंगाने थकीत कर्जदार सभासदांची माहिती संकलित करून विहित नमुना प्रपत्र अ व बंद तयार करून त्या शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याचे काम सुरू आहे. शासनाने कर्जमाफी जाहीर केल्यास याला जिल्ह्यातील अंदाजे ४१ हजार ८०० शेतकरी पात्र ठरण्याची शक्यता आहे.

शेतकरी नेते माजी आ. बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा या मागणीसाठी नागपूर येथे शेतकऱ्यांसह आंदोलन केले होते. यानंतर शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर करण्याचे आश्वासन दिले होते. कर्जमाफीचे स्वरूप कसे असणार, कोणत्या शेतकऱ्यांचा त्यात समावेश असणार या संदर्भातील प्रक्रियेसाठी सहा महिन्यांचा अवधी मागितला होता. आता शेतकरी कर्जमाफीच्या प्रक्रियेला वेग आला आहे. शासनाने सहकार उपनिबंधक कार्यालयाकडून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या कर्जदार शेतकऱ्यांच्या याद्या व त्यांचे आधार कार्ड, बँक खाते क्रमांक, सातबारा व इतर कागदपत्रे मागविली आहे. विधिमंडळाच्या अर्थसंकल्प अधिवेशनादरम्यान शेतकरी कर्जमाफीची घोषणा होण्याची शक्यता आहे. यासाठी जिल्ह्यातील ४१ हजार ८०० शेतकरी पात्र ठरण्याची शक्यता आहे.




## पाच वर्षांची भरली जात आहे कर्जाची माहिती

**कर्जदार शेतकरी सभासदांची माहिती प्रपत्र अ व ब मध्ये सादर करण्यात येणार असून, अ नमुन्यामध्ये थकबाकीदार शेतकऱ्यांची निश्चित केलेल्या तारखेची यादी व प्रपत्र ब मध्ये नियमित कर्ज परतफेड करणारे शेतकरी अशी वर्गवारी आहे. सन २०२१ ते २०२५-२६ अशी पाच वर्षाची माहिती यात भरली जाणार आहे.**

## एकूण २९० कोटी रुपयांचे आहे थकीत कर्ज

**जिल्ह्यातील कर्जमाफीसाठी पात्र ठरू शकणाऱ्या ४१ हजार ८०० शेतकऱ्यांकडे एकूण २९० कोटी रुपयांचे कर्ज थकीत आहे. यात १६० कोटी मुद्दल, तर १३० कोटी त्यावर व्याज असे एकूण २९० कोटी रुपयांचे कर्ज थकीत आहे.**

## शेतकऱ्यांना जमा करावी लागणार ही कागदपत्रे

**आहे. यासाठी जिल्ह्यातील ४१ हजार ८०० शेतकरी पात्र ठरण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील सेवा सहकारी संस्थांचे या थकीत कर्जदार शेतकरी सभासदांनी अद्यापही त्यांचे आधार कार्ड, फार्मर आयडी, बँक खाते क्रमांक व इतर अनुषंगिक माहिती अद्यापही सेवा सहकारी संस्थांना सादर केलेली नाही अशा सर्व शेतकरी सभासदांनी संबंधित शाखेचे सचिव किंवा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे शाखेचे वसुली अधिकारी यांच्याशी त्वरित संपर्क करून त्यांचे आधार कार्ड व इतर माहिती उपलब्ध करून द्यावी, असे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था गोंदिया व गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कळिवले आहे.**

# संचमान्यतेत रिक्त पदे चार, नियुक्त्या मात्र १४ शिक्षकांच्या

**गोंदिया :-** महेंद्र मेश्राम हे सचिव असलेल्या चंद्रमणी बुद्ध विहार समिती या शिक्षण संस्थेत शिक्षकांच्या नियुक्तींमध्ये बोगसपणा झाला आहे. या संस्थेच्या चार शाळा असून, चारही शाळांत २०२३-२४ व २०२४-२५ या कालावधी १४ शिक्षकांची अवैध पद्धतीने नियुक्ती केली आहे. विशेष म्हणजे संस्थेच्या चारही शाळांची संचमान्यता तपासली असता, केवळ ४ पदे रिक्त असताना १४ पदे भरलीच कशी आणि गोंदियाचे शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक उल्हास नरड यांनी मंजुरी देऊन शिक्षकांचे वेतन कसे सुरू केले, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

नागपूर येथे तपास सुरू असून, गोंदिया जिल्ह्याचे माध्यमिक शिक्षण अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात माहिती मागविण्यात आली आहे. चंद्रमणी बुद्ध विहार समिती या संस्थेच्या जिल्ह्यात अमृताबेन इंदिराबेन पटेल विद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल, सरकाटोला, मिलिंद विद्यालय गोरठा व बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे कनिष्ठ महाविद्यालय साखरीटोला या शाळा आहेत. या शाळांमध्ये १४ शिक्षकांना सहायक शिक्षक म्हणून शिक्षण विभागाने मान्यता प्रदान केली आहे. संस्थेने सहायक शिक्षकांच्या नियुक्तीसाठी खोटी व बनावट संचमान्यता तयार करून विद्यार्थ्यांची संख्या मोठी दाखवून नियुक्त्या केल्याचा आरोप आहे. संस्थेच्या शाळेतील संचमान्यतेचे अवलोकन केले असता, शिक्षक पदासाठी वर्ग नववी ते दहावीसाठी ३ पद रिक्त असताना मोठ्या प्रमाणात शासकीय वेतनात शिक्षक भरती करण्यात आली. वर्ग ६ ते ८ साठी शिक्षक पात्रता टीईटी असल्यामुळे वर्ग ९ ते १० साठी शिक्षकांची नेमणूक करून शासनाचे आर्थिक नुकसान करण्यात आले.

## संस्थेला अडचणीत आणण्याचा प्रयत्न

**यासंदर्भात चंद्रमणी बुद्ध विहार समिती शिक्षण संस्थेचे सचिव महेंद्र मेश्राम यांना विचारणा केली असता या सर्व नियुक्त्या या तत्कालीन मुख्याध्यापक यांनी मला आणि संचालक मंडळाला अंधारात ठेवून केल्या आहेत. यासंदर्भात न्यायालयात याचिकासुद्धा दाखल केली आहे. संस्थेत अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीसुद्धा स्वतंत्र प्रमाणपत्राच्या आधारावर करण्यात आल्या आहेत. यात कुठेही नियमाचे उल्लंघन करण्यात आलेले नाही. तत्कालीन मुख्याध्यापक आणि काहींनी संस्थेला हेतुपुरस्पर बदनाम करून अडचणीत आणण्यासाठी हा सर्व प्रकार केल्याचे महेंद्र मेश्राम यांनी सांगितले.**

## एकाच अनुकंपाच्या आधारे २ परिचराची पदभरती

**संस्थेमध्ये चंद्रकुमार मेश्राम, आशिष कांबळे व अमित रंगारी यांना परिचर पदासाठी अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती करण्यात आली. मात्र, यातील दोन परिचरांसाठी एकच अनुकंपा प्रमाणपत्र वापरण्यात आले आहे.**

## लिपिकाला बनविले शिक्षक

**याप्रकरणी संस्थेच्या मिलिंद विद्यालय, गोरठा येथे लोकचंद ग्यानीराम हेमने यांची नियुक्ती १२ जुलै २०२४ रोजी शिक्षण सेवक म्हणून दाखविली आहे; परंतु हेमने हे त्याच संस्थेवर अनेक वर्षापासून लिपिकाचे कार्य करीत होते. त्यांच्या डिग्रीवर सुद्धा तक्रारीत शंका उपस्थित केली आहे.**

# साकोली-अर्जुनी मोरगाव-वडसा मार्गावर बससेवा सुरू करा



**अर्जुनी मोरगाव :-** साकोली ते वडसा या मार्गावर इटखेडा-खामखुरा-कोरंभी-अर्जुन नगर-आसली-गोरानगर आदी गावांना जोडणारी नियमित प्रवासी बस तातडीने सुरू करावी, अशी जोरदार मागणी खामखुरा येथील ग्रामस्थांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कडे निवेदनाद्वारे केली आहे. बससेवा नसल्याने दळणवळणाचा प्रश्न गंभीर बनला असून नागरिकांना दररोज हालअपेष्ट सहन कराव्या लागत आहेत.

सदर मार्गावर सध्या कोणतेही नियमित सार्वजनिक प्रवासी साधन उपलब्ध नसल्याने रुग्णांना वेळेवर उपचारासाठी रुग्णालयात पोहोचणे कठीण होत आहे. मआपत्कालीन परिस्थितीत खासगी वाहनांची वाट पाहावी लागतेः काही वेळा जीवितहानीचा धोका निर्माण होतो,फ अशी खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांचेही मोठे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे पुढे आले आहे. उच्च शिक्षणासाठी अर्जुनी/मोर व वडसा येथे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज प्रवासाची गैरसोय भेडसावत आहे. शेतकरी, कामगार आणि लहान व्यावसायिकांनाही बाजारपेठ व शासकीय कार्यालयीन कामांसाठी ये-जा करताना मोठा आर्थिक व वेळेचा फटका बसत आहे.

वडसा येथे मोठी बाजारपेठ, विविध शासकीय कार्यालये व आरोग्य सुविधा उपलब्ध असल्याने हा मार्ग वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. संबंधित मार्ग बससेवेसाठी सक्षम असून प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, या मागणीच्या प्रती स्थानिक आमदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. लवकर सकारात्मक निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.सदर निवेदनावर किशोर तरोणे, प्रा. लक्ष्मीकांत बुरडे, लक्ष्मीकांत पालीवाल, इंजी. निपल बरय्या (उपसरपंच, ग्रामपंचायत खामखुरा) आदींनी स्वाक्षऱ्या करून अर्ज सादर केला आहे

# बोगस कागदपत्राच्या आधारे जिल्हा एमआयएस पदावर भर्ती

**गोंदिया:-** महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमीयोजनेअंतर्गत गोंदिया जिल्हा कार्यालयातील एमआयएस पदावर बोगस शैक्षणिक कागदपत्राच्या आधारे बाह्यस्त्रोत यंत्रणेद्वारे भर्ती करुन शासनाची फसवणूक करण्यात आल्याने चौकशी करण्याची मागणी युवाओ की आवाज गैर राजकीय संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन रहांगडाले यांनी विभागीय आयुक्त तसेच मनरेगा आयुक्त यांना निवेदन सादर करुन केली आहे.

युवाओ की आवाज गैर राजकीय संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन रहांगडाले यांनी पत्र परिषद घेत गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयातील मनरेगा कार्यालयात किशोर मांडले (रा.लातुर) यांची एमआयएस पदावर एस२ इन्पोटेक लि.मी.च्यावतीने पदाकरिता योग्य पात्रता नसतांनाही भर्ती करण्यात आले आहे.

तांत्रीक अनुभव आणि पात्रता नसल्यामुळे गोंदिया जिल्ह्यातील विविध कामांना तसेच योजनेचा निधी मिळविण्यात जिल्ह्याला अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्यातच कुशल, अर्धकुशल, व्यक्तीगत व सार्वजनिक कामांची निधी प्रलंबित असून २०२२-२३ वर्षातील एफटीओ रद्द करण्यात आले आहे. ते रद्द करण्यात आलेले बिल नव्या प्रणालीत सादर करावयाचे होते. मात्र तसे करण्यात आले नाही. त्यातच ग्राम पंचायत व यंत्रणेचे वेंडर रद्द करण्याचे प्रस्ताव देण्यात आल्याने अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

त्यातच सदर एमआयएस अधिकाऱ्याने कार्यालयातील महिला अधिकाऱ्यांसोबत सुद्धा अपशब्दाचा वापर केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. मांडले यांच्या विरोधात आयुक्तांकडे तक्रार असतांना आणि मनरेगा आयुक्त यांनी जिल्हाधिकारी यांना सदर प्रकरणात चौकशी करण्याचे निर्देश दिलेले असतांनाही योग्य ती चौकशी न करता ११ महिन्याचे करार संपण्यापुर्वीच पुर्ननियुक्तीचे आदेश देत जिल्हा प्रशासन चुकीच्या गोष्टींना पाठिशी घालत असल्याचा आरोप रहांगडाले यांनी पत्र परिषदेत केला.

या पत्र परिषदेला नरेंद्र चिखलोंढे, आरती पारधी, मुनेश्वर चिखलोंढे, गणेश पटले, इमरान कुरैशी, नितीन तुरकर, अशोक सोनटक्के, शितल पाचे, मंगेश शेंडे आदि उपस्थित होते.

# मामा तलावात दुर्गंधीयुक्त पाणी

## छोटा गोंदिया येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात; सौंदर्यीकरणाच्या मागणीकडे दुर्लक्ष

**गोंदिया:-** नगर परिषद हद्दीत येणाऱ्या छोटा गोंदिया परिसरातील मामा तलाव प्रदूषणाच्या विळख्यात सापडला आहे. तलावातील दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. एकेकाळी मानव आणि जनावरांसाठी उपयुक्त ठरलेला हा तलाव आजघडीला शेवाळ आणि जलपर्णीने पूर्णपणे व्यापला आहे.

३० ते ३५ वर्षांपूर्वी या तलावाचे पाणी पिण्यासह घरगुती वापरासाठीही उपयोगात येत होते. परिसरातील नागरिक याच पाण्यावर अवलंबून होते. मात्र, वाढती लोकसंख्या, झालेले अतिक्रमण आणि मामा तलावाची रखडलेली देखभाल यामुळे तलावाचे रूपांतर आता दूषित जलसाठ्यात झाले आहे.

तलावात मोठ्या प्रमाणावर शेवाळ आणि जलपर्णी वाढल्या असून, तीव्र दुर्गंधी पसरत आहे. सायंकाळच्या वेळी तर दुर्गंधीमुळे परिसरात थांबणेही कठीण होते, असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. दुर्गंधी आणि दुषित पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढली असून, मलेरिया, डेंगी यासारख्या आजारांचा धोका या परिसरात वाढला आहे.



उल्लेखनीय म्हणजे, स्थानिक नागरिकांनी अनेकदा नगर परिषद तसेच जिल्हा परिषद यांच्याकडे तलावाची स्वच्छता व सौंदर्यीकरणाबाबत निवेदने दिली. परंतु, प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही. दरम्यान, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने या तलावाच्या सौंदर्यीकरणाची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**जबाबदारीवरून ढकलाढकली**

तलावाच्या देखभालीची जबाबदारी नेमकी कोणाकडे? यावरून नगर परिषद आणि जिल्हा परिषद यांच्यात समन्वयाचा अभाव दिसून येतो. दोन्ही यंत्रणा एकमेकांकडे बोट दाखवत असल्याने समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिणामी, तलावाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे.


# जिल्हा परिषदेच्या क्रीडा महोत्सवाचे आयोजन

**गोंदिया :-** जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत कार्यरत असलेले सर्व पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी २५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या तीन दिवसीय महोत्सवात विविध क्रीडा स्पर्धा, गायन स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम असणार आहेत. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, गोंदिया येथे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम असतील, तर अतिथी म्हणून जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, उपवनसंरक्षक पवनकुमार जोंग उपस्थित राहणार आहेत.

# सेवा ज्येष्ठता यादीत ज्येष्ठ शिक्षकांवर अन्याय

**गोंदिया :-** सध्या प्रचलित असलेल्या पद्धतीनुसार सेवाज्येष्ठता यादी बनवताना केवळ हायस्कूलमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांचाच पदोन्नतीसाठी विचार केला जात असल्याचे शिक्षकांनी निदर्शनास आले आहे. यामुळे सुपरवायझर आणि प्राचार्य यांसारखी महत्त्वाची पदे केवळ त्याच शिक्षकांना मिळतात, परिणामी संस्थेतील इतर ज्येष्ठ शिक्षकांवर मोठा अन्याय होत असल्याची भावना निर्माण झाली आहे. याकडे लक्ष देवून एकच सेवाज्येष्ठता यादी तयार करुन ज्येष्ठ शिक्षकांवर होणारा अन्याय दूर करा, अशी मागणी शिक्षकांकडून करण्यात आली आहे.

सेवा ज्येष्ठता यादी तयार करताना होणाऱ्या अन्यायामुळे गोंदिया शिक्षण संस्थेतील सर्व शिक्षकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. सेवा ज्येष्ठता यादी तयार करताना फक्त हायस्कूलमध्ये कार्यरत शिक्षकांचाच विचार केला जातो, असे शिक्षकांकडून बोलले जात आहे. या संदर्भात शिक्षकांनी नियमावली १९८१ (फ) आणि शालेय शिक्षण विभागाने २३ जानेवारी रोजी निर्गमित केलेल्या नवीन शासन आदेशाचा दाखला दिला आहे. या नवीन शासन निर्णयाची जर काटेकोरपणे अंमलबजावणी झाली, तर कोणत्याही शिक्षकावर अन्याय होणार नाही आणि प्रत्येक पात्र शिक्षकाला न्यायाने पदोन्नतीची संधी मिळेल, असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला आहे. सेवाज्येष्ठतेनुसार प्रत्येकाला सुपरवायझर व प्राचार्य पदाची जबाबदारी स्वीकारून काम करण्याची समान संधी मिळावी, यासाठी गोंदिया शिक्षण संस्थेतील सर्व शिक्षकांनी एकत्र येऊन ही मएकच सिनियरिटी लिस्टफ बनवण्याची आग्रही मागणी केली आहे.



## शिक्षणाधिकाऱ्याला निवेदन

**गोंदिया शिक्षण संस्था, गोंदिया द्वारे संचालित शाळांमधील इयत्ता ५ वी ते १२ वी या वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांची एकच सेवाज्येष्ठता यादी तयार करण्याबाबतचे निवेदन माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. सध्या या संस्थेमध्ये इयत्ता ५ वी ते १० वी आणि इयत्ता ११ वी व १२ वी साठी दोन स्वतंत्र सेवाज्येष्ठता याद्या अस्तित्वात आहेत. या दुहेरी पद्धतीमुळे मुख्याध्यापक किंवा प्राचार्य पदावर नियुक्ती करताना केवळ ५ वी ते १० वी पर्यंत शिकविणाऱ्या शिक्षकांचाच विचार केला जातो, ज्यामुळे इतर पात्र शिक्षकांवर अन्याय होत असल्याची बाब निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदन देताना के. सी. चौधरी, व्ही. आर. मेश्राम, ए. जी. भगत, जे. एन. बिसेन, पी. डी. बसने, श्रीमती जे. एस. विभुते आणि जे. आर. भेंडारकर आदिंसह शिक्षक उपस्थित होते.**

# झाशीनगर सिंचनच्या कामाला येणार गती

**अर्जुनी मोरगाव:-** तालुक्यातील झाशीनगर उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी मुंबई मंत्रालयात १८ फेब्रुवारी रोजी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आ. राजकुमार बडोले यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या निर्देशानुसार ही बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी योजना मार्गी लावण्यासाठी त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

बैठकीत झाशीनगर उपसा सिंचन योजनेच्या प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सन १९९६ मध्ये मंजूर झालेल्या या योजनेला २००५ मध्ये वनविभागाची मुख्य कालव्याला मंजुरी मिळाली होती. मात्र, कालव्याच्या कामादरम्यान दगड लागल्याने सुमारे ३० मीटरचे काम अपूर्ण राहिले आणि त्यानंतर प्रकल्प वनविभागाकडून राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची नव्याने परवानगी घेण्याची अट ठेवल्याने आ. बडोले यांनी तीव्र आक्षेप नोंदवला. आधीच मंजुरी मिळालेल्या कामासाठी परवानगीची नव्याने अट लावल्यास प्रकल्पास आणखी विलंब होईल, असे सांगितले. यावर मंत्री गिरीश महाजन यांनी वनविभागाने सकारात्मक भूमिका घेऊन तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. रामपुरी, तिडका व झाशीनगर येथील लघू कालव्यांच्या पीडीएन पद्धतीच्या कामांना पूर्वीच मंजुरी देण्यात आली असून, विधी व न्याय विभागाच्या मार्गदर्शनाखाली काम त्वरित सुरू करण्याचे आदेश देण्यात आले.

इटियाडोह प्रकल्पामुळे सुमारे ५० वर्षांपूर्वी विस्थापित झालेल्या झाशीनगर गावाचे निर्विणीकरण अद्याप का झाले नाही, हा मुद्दाही बैठकीत उपस्थित करण्यात आला. याबाबत समाधानकारक माहिती न मिळाल्याने संबंधित विभागांना दहा दिवसांत निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीला जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव बेलसरे, विदर्भसिंचन विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक सोनटक्के, मुख्य अभियंते, मुख्य वनसंरक्षक लक्ष्मी, रामगावकर व अधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर झाशीनगर उपसा सिंचन योजना मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली असून, परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



## २८ वर्षे लोटली तरी सिंचनासाठी पाणी मिळेना !

**झाशीनगर उपसा सिंचन योजनेला सन १९९६ मध्ये मंजुरी मिळाली. सुरुवातीला या प्रकल्पावर १४ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. मात्र प्रकल्प रखडल्याने ही योजना आता १७५ कोटी रुपयांवर पोहचली आहे. तब्बल २८ वर्षापासून झाशीनगर उपसा सिंचन योजना कागदावरच राहिली आहे. खर्चात प्रचंड वाढ होऊनही आजपर्यंत शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचलेले नाही.**